# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१५

----------------------------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ०९ डिसेंबर, २०१५ / अग्रहायण १८, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **परिवहन मंत्री** | |
| **(३)** | **उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** | |

------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - १०३**

------------------------------

### भोर (जि.पुणे) तालुक्यातील आंबवडे खोऱ्यातील टिटेघर या गावात वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसामुळे झालेले नुकसान

**(१) * ३००५५ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) तालुक्यातील आंबवडे खोऱ्यातील टिटेघर या गावात वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसामुळे शाळाखोल्या, अंगणवाडी इमारत व गावातील १० ते १५ घरांची छते उडून गेली असल्याचे माहे मे, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ६ मे, २०१५ रोजी झालेल्या वादळी वाऱ्यासह गारांच्या पावसाने टिटेघर येथील जिल्हापरिषदेच्या चार प्राथमिक शाळाखोल्या, अंगणावाडी इमारतीचे छते उडून गेल्याने व फर्निचर, साहित्यांचे नुकसान झाले असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.
(२), (३) व (४) दि. ५.५.२०१५ रोजी वादळी वा-यासह झालेल्या मुसळधार पावसाने भोर तालुक्यातील आंबवडे खो-यातील टिटेघर या गावात शाळाखोल्या, अंगणवाडी इमारत व १० ते १५ घरांची छते उडून गेल्याचे निदर्शनास आले असून याबाबत पंचनामे करण्यात आले आहेत.

विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी सदरची शाळा सध्या गावातील भैरवनाथ मंदिर, ग्रामपंचायत कार्यालय व जुन्या शाळेतील चार खोल्यांमध्ये भरत आहे. नुकसानग्रस्त शाळाखोल्या, अंगणवाडी शाळेच्या इमारतीचे दुरूस्तीबाबत जिल्हा परिषद स्तरावर कार्यवाही चालू आहे.

सदर दिवशीचे पर्जन्यमान ६५ मि.मी. पेक्षा कमी असून, नैसर्गिक आपत्तीच्या निकषानुसार मदत अनुज्ञेय नसल्याने घरांच्या नुकसानीसाठी सानुग्रह अनुदान देण्यात आलेले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी वसतीगृहातील विद्यार्थ्यांना राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसचा पास मोफत देण्याबाबत

**(२) * ३३०३० श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आदिवासी विकास विभागामार्फत सुरु करण्यात आलेल्या वसतीगृहात सन २०१५-२०१६ या वर्षात विद्यार्थ्यांना मोठया प्रमाणात प्रवेश न मिळाल्याने त्या विद्यार्थ्यांना आदिवासी वाड्यापाड्यातून शिक्षणासाठी शहरात जा-ये करणे आर्थिक खर्चाचे होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील आदिवासी वाड्यापाड्यातून शिक्षणासाठी शहरात जा-ये करण्यासाठी विद्यार्थ्यांना राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसचा पास मोफत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) आदिवासी विकास विभागामार्फत कार्यरत शासकीय आदिवासी वसतीगृहात सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात एकूण ५५९९८ इतक्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे. वसतीगृहाकरिता वाढीव क्षमतेची मागणी असून त्याअभावी विद्यार्थी प्रवेशापासून वंचीत आहेत, ही बाब खरी आहे.

(२) सद्यस्थितीत शिक्षणासाठी शहरात जा-ये करण्यासाठी विद्यार्थ्यांना एस.टी. बसचा मोफत पास देण्याबाबत विभागाची कोणतीही योजना कार्यान्वीत नाही.

तथापि, राज्यातील अनुसूचित जमातीच्या वसतीगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती अंतर्गत मासिक निर्वाह भत्ता देण्यात येतो. तसेच राज्यातील विविध व्यावसायिक पाठ्यक्रमांत शिक्षण घेणाऱ्या व वसतीगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती अंतर्गत मिळणाऱ्या निर्वाहभत्त्याव्यतिरिक्त अभ्यासक्रमनिहाय कमाल रू.१००० पर्यंत मासिक निर्वाह भत्ता देण्यात येतो. सदर निर्वाह भत्ता दैनंदीन खर्च भागविण्याकरिता देण्यात येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अमरावती, वर्धा व वाशिम या जिल्ह्यातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटूंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(३) * २९८०२ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील धामणगाव तालुक्यात सततची नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून दोन शेतकऱ्यांनी व वर्धा जिल्ह्यात देवळी तालुक्यातील लोणी येथील एक शेतकऱ्याने आत्महत्या केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच वाशिम जिल्ह्यात सप्टेंबर महिन्यात १८ शेतकरी आत्महत्येपैकी केवळ चार आत्महत्या पात्र ठरविल्या आहेत, कर्जदार ८ शेतकऱ्यांच्या आत्महत्या अपात्र ठरविण्यात आल्या असून दोन प्रकरणे प्रलंबित तर दोन प्रकरणे वगळण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकरी आत्महत्या प्रकरणाच्या निकषांमध्ये शिथिलता आणून सर्व आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटूंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय,
(२) वाशिम जिल्हयात १८ आत्महत्यांपैकी ६ आत्महत्या पात्र, ८ अपात्र, २ चौकशीसाठी प्रलंबित व २ आत्महत्या भुमीहिनांच्या असल्यामुळे वगळण्यात आल्या आहेत.
(३) नापिकी, कर्जबाजारीपणा व कर्जबाजारीपणाचा तगादा या तीन कारणांसाठी झालेल्या पात्र आत्महत्यांप्रकरणी प्रत्येकी रु.१.०० लक्ष सानुग्रह अनुदान देण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वीज पडण्याच्या शक्यतेचे पूर्वानुमानबाबतची अलर्ट**
**एसएमएस सुविधा सुरु करण्याबाबत**

**(४) * ३५१४१ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात १० वर्ग किलोमीटरच्या परिसरात वीज पडण्याच्या शक्यतेचे पूर्वानुमान करण्याची यंत्रणा दोन वर्षापासून सज्ज आहे, परंतु अलर्ट एसएमएसचा खर्च कोणी करायचा यावरुन केंद्र आणि राज्यात दोन वर्षापासून निर्णय झालेला नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सरकारच्या हलगर्जीपणामुळे राज्यात ४० च्या वर नागरिक वीज पडल्याने मृत्युमुखी पडले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत तातडीने निर्णय घेऊन अलर्ट एसएमएस सुविधा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.

(२), (३) व (४) भारतीय उष्णकटीबंधीय हवामान संस्था (IITM) यांनी वीज पडण्याचे पूर्वानुमान करण्याची यंत्रणा मार्च, २०१४ मध्ये विकसित केली आहे. मात्र, या यंत्रणेची चाचणी चालू आहे. सदर यंत्राणा ३० ते ६० मिनीट अगोदर कोणत्या ठिकाणी वीज पडेल याचे पुर्वानुमान करु शकते. मात्र, निश्चित कोणत्या ठिकाणी वीज पडेल यांचे पुर्वानुमान शक्य नाही. भारतीय उष्णकटीबंधीय हवामान संस्था (IITM), भारतीय हवामान खाते आणि राज्य शासन यांच्या समन्वयाने एसएमएस अलर्ट सिस्टीम उभारण्यात येईल असे IITM यांनी कळविले आहे.

-----------------

**पुण्यातील नांदेड (गाव) येथील मे.अक्षय इंडस्ट्रीज या बर्फाच्या कारखान्यात वीज चोरी होत असल्याबाबत**

**(५) * ३२८३६ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील नांदेड (गाव) सर्व्हे नं.१० मधील मेसर्स अक्षय इंडस्ट्रीज या बर्फाच्या कारखान्यात वीज चोरी होत असल्याचा संशय आल्याने पुणे माहवितरणच्या कर्मचाऱ्यांनी चौकशी करुन बर्फाच्या कारखान्यात रिमोट कंट्रोलद्वारे होणारी तब्बल ११ लाख ९२ हजार ७३५ रुपयांची वीजचोरी दिनांक १६ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आणली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मेसर्स अक्षय इंडस्ट्रीज या बर्फाच्या कारखाना मालकावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) महावितरण कंपनीने सदर प्रकरणी चौकशी केली आहे.

(३) महावितरण कंपनीकडून मे. अक्षय इंडस्ट्रीज या बर्फाच्या कारखान्याच्या मालकावर रास्तापेठ पोलीस स्टेशन येथे दिनांक १७.१०.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा एफआयआर क्र.४४४/१५ असा आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील वाहनांच्या लिलावामध्ये झालेला आर्थिक गैरव्यवहार**

**(६) * ३०७६६ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हाजुरीतील जलाल मुजावर यांनी आयुक्त व ठाणे प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडे ठाणे प्रादेशिक परिवहनातील ६० भंगार वाहनांच्या लिलावामध्ये आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबतची तक्रार केल्याची बाब दिनांक ९ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे कय,

(२) असल्यास, कालबाह्य ठरलेल्या ६० वाहनांचा लिलाव करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश असताना ठाणे प्रादेशिक परिवहने ४२ वाहनांचाच लिलाव करणे, लिलावाची नोटीस निविदा प्रसिध्द करताना कमी खपाच्या वर्तमानपत्रांना देणे इत्यादी अनेक आरोप या निवेदनात करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास दिनांक २८ सप्टेंबर, २०१५ रोजी ६० वाहनांपैकी ४२ वाहनांचाच लिलाव करुन उर्वरित १८ वाहने संबंधित मालकांना परत करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यामध्ये दोषी आढळलेल्या व्यक्तींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

दि.२८.०९.२०१५ रोजी ६० वाहनांपैकी ४२ वाहनांचा लिलाव करुन उर्वरीत १८ वाहनांचा लिलाव तांत्रिक कारणामुळे रोखण्यात आला असून सदर वाहने प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे यांच्या कार्यालयाच्या आवारात जमा आहेत.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खामगाव (जि.बुलढाणा) येथील अतिवृष्टी व गारपीटमुळे पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अनुदान न मिळाल्याबाबत

**(७) * २९१७६ श्री.आकाश फुंडकर (खामगांव), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव (जि.बुलढाणा) येथे सन २०१४-२०१५ मध्ये अतिवृष्टी व गारपीटमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतक-यांना नुकसान भरपाईपोटी शासनाने जाहीर केलेल्या पीकानुसार अनुदान त्यांच्या खात्यात जमा झाले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांचे खाते क्रमांक चुकविल्याने अनुदान हे दुसऱ्या व्यक्तीच्या खात्यात जमा झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. प्राप्त अनुदानापैकी ९६ टक्के रक्कम शेतक-यांच्या खात्यात जमा करण्यात आली आहे.

(३) हे अंशत: खरे आहे. किरकोळ प्रमाणात अशा घटना घडलेल्या आहेत. तथापि, असा प्रकार घडल्याचे संबंधित शेतक-यांनी लक्षात आणून दिल्यानंतर संबंधित बँकेच्या मदतीने अशी रक्कम सदरहू शेतक-यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आलेली आहे.

(४) संबंधितांच्या बँक खातेमध्ये नुकसान भरपाई देणे सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हयातील आंबा बागायतदारांना नुकसान भरपाईपोटी जाहीर झालेल्या मदतीच्या वाटपातील अडचणीबाबत

**(८) * ३६४८१ श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील आंबा बागायतदारांना नुकसान भरपाईपोटी शासनाकडून जाहीर झालेल्या मदतीच्या रक्कमेपैकी सुमारे ४४ लाख रुपयांचे वाटप थांबले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नुकसानग्रस्त बागायतदारांपैकी काहींच्या सात-बारा उताऱ्यावर एका पेक्षा जास्त नावे असल्यामुळे त्यांचे वाटप करण्यात अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पूर्वीप्रमाणे हमीपत्राव्दारे मदतीचे वाटप करणेबाबत जनतेतून तसेच लोकप्रतिनिधींकडून वारंवार मागणी होत असूनही त्याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे नुकसानग्रस्त शेतकरी बागायतदार यांना मदतीपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) रत्नागिरी- सिंधुदुर्ग जिल्ह्यात माहे फेब्रुवारी व मार्च २०१५ मध्ये झालेल्या आंबा व काजू बागायतदार आपदग्रस्तांच्या नुकसानीबाबत मदत देण्यास आलेल्या अडचणीबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**पोखरी, गारज, बाभूळगांव (ता.वैजापूर, जि.औरंगाबाद) विभागातील शेतक-यांना रब्बी हंगामासाठी दिलेल्या हरभरा बियाणे वाटपात झालेला गैरव्यवहार**

**(९) * २८९८५ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोखरी, गारज, बाभूळगांव (ता.वैजापूर, जि.औरंगाबाद) विभागातील शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी या वर्षी कृषी विभागामार्फत गारज मंडळ कृषी विभागास हेक्टरी ७५ किलो हरभरा बियाणे तालुक्यातील शेतकऱ्यांच्या समान वाटपासाठी देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गारज मंडळ कृषी विभागाने मोजक्याच शेतक-यांना हरभरा बियाणे वाटल्याने बऱ्याच शेतकऱ्यांना बियाणे न मिळाल्याच्या तक्रारी अधिकाऱ्यांकडे शेतक-यांनी माहे ऑक्टोबर २०१५ मध्ये वा त्या दरम्यान केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती बियाणे वाटपात गैरव्यवहार करणा-यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.

पोखरी व बाभूळगांव या गावात २१२ शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी हरभरा बियाणे वाटप कराण्यात आलेले आहे.
(२) ऑक्टोबर २०१५-१६ दरम्यान अशा प्रकारची तक्रार प्राप्त नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जळगांव जिल्हयात वादळी वाऱ्यासह पाऊस व गारपीटमुळे शेतीपिके व फळपिकांचे झालेले नुकसान**

**(१०) * २८३२० श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हयात दिनांक १० ते १३ सप्टेंबर २०१५ रोजी वा त्यासुमारास झालेल्या वादळी पावसासह गारपीटीमुळे केळी, कपाशी, पपईचे मोठया प्रमाणात नुकसान होऊन सदर नुकसानीचा आकडा १३ हजार हेक्टरवर पोहचला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नुकसानीचा अहवाल कृषि विभागाने शासनाला सादर केला आहे काय,
(३) असल्यास, सदर नुकसानीचे पंचनामे करुन तदनुसार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, शेतकऱ्यांनी झालेल्या नुकसानीचे हेक्टरी ५० हजाराची भरपाई देण्याबाबत मागणी केली आहे काय,
(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे अंशत: खरे आहे. दि. १० ते १८ सप्टेंबर, २०१५ दरम्यान जळगाव जिल्हयामध्ये झालेल्या वादळी वारा व पावसामुळे शेतीपिके व फळपिकांचे एकूण ५२८०.१४ हेक्टर क्षेत्र बाधित झाल्याचा अहवाल प्राप्त झाले आहेत.

(२) व (३) होय. सदर अहवालाची तपासणी करण्यात येत आहे.
(४) नाही.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**डिग्रस बु. (ता.देऊळगांवराजा, जि.बुलढाणा) येथील खडकपूर्णा नदीपात्रात अवैध रेती उपसा होत असल्याबाबत**

**(११) * ३४२७८ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डिग्रस बु. (ता.देऊळगांवराजा, जि.बुलढाणा) येथील खडकपूर्णा नदीपात्रात अवैध रेती उपसा होत असल्यामुळे गेल्या काही वर्षापासून पिण्याच्या पाण्याची व जनावरांच्या पाण्याची भीषण समस्या निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या नदीपात्रातील पाण्यातून शेतीच्या सिंचनासाठी पाणी पुरवठादेखील केला जात आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त नदीपात्रातून अवैधरित्या रेती उपसामुळे शासनाचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाच्या नियम व शर्तीचे उल्लंघन करणा-या दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) खडकपूर्णा नदीपात्रातून अवैधरित्या रेती उपशाची काही प्रकरणे दृष्टोत्पतीस आली आहेत. तथापि, अशा निदर्शनास येणाऱ्या प्रकरणात नियमानुसार वेळोवेळी दंडात्मक कार्यवाही करण्यात येत असून, एप्रिल, २०१५ ते ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत खडकपूर्णा नदीपात्रातील अवैध रेती उपशाच्या १५ प्रकरणामध्ये रूपये १,२३,६००/- एवढी दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**गोरेगाव (जि.हिंगोली) येथे विद्युत प्रवाहामुळे एका तरुणाचा झालेला मृत्यू**

**(१२) * ३०२१७ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (जि.हिंगोली) येथे विद्युत प्रवाहामुळे एका तरुणाचा मृत्यू झाल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या कुटूंबाला आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी वीज वितरणाच्या दोषी असणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी विद्युत निरीक्षक,हिंगोली यांनी चौकशी केली आहे.

(३) सदर घटनेत श्री. अनिल भगवान मुधळकर वय वर्षे १६ हा गांधीनगर गोरेगाव येथील त्यांच्या घराच्या अंगणातील उंच वाढलेल्या सुबाभळीचे झाड तोडत असतांना झाडाची फांदी सदर विद्युत वाहिनीच्या संपर्कात आल्याने प्राणांतिक अपघात घडला.

मृतकाच्या वारसास वीज वितरण कंपनीकडून नियमानुसार दिनांक २०.११.२०१५ रोजी रु.२ लाख एवढी नुकसान भरपाई प्रदान करण्यात आली आहे.

(४) सदर प्रकरणी विद्युत निरीक्षक हिंगोली यांचेकडून संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नाशिक जिल्ह्यातील चांदवड तालुक्यात कोरडवाहू विकास अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(१३) * ३७२१६ डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील चांदवड तालुक्यात शासनाच्या कोरडवाहू विकास अभियानांतर्गत कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांसाठी अनुदान तत्वावर राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची सुमारे २ कोटी २७ लाख रुपयांची कामे प्रलंबित असल्याची बाब माहे ऑक्टोंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चांदवड तालुक्यातील मंगरुळ गावासाठी राज्य शासनाने तीन वर्षासाठी ३ कोटी ५० लाख रुपये खर्चाची कोरडवाहू विकास अभियान योजना मंजूर केली होती मात्र २०१३-१४ व २०१४-१५ या वर्षासाठी ३.५० कोटी अनुदानापैकी केवळ १ कोटी १३ लाख रुपयांची कामे करण्यात आली व अद्याप २ कोटी ३७ लाख रुपयांची कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापही २ कोटी ३७ लाख रुपयांची कामे पूर्ण करण्यास निधी न देण्याची कारणे काय,

(४) असल्यास, तातडीने हा निधी वितरीत करुन कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

चांदवड तालुक्यातील मंगरूळ गावासाठी एकूण तीन वर्षासाठी २९६.३२ लाख रूपयाचा प्रस्तावित कार्यक्रम मंजूर आहे, पैकी सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये एकूण १२०.३५ लाखाची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. उर्वरीत १७५.९७ लाख रूपयांची कामे प्रलंबित आहेत.

(३) सन २०१५-१६ करीता निधी वितरणाचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(४) निधी वितरणाची कार्यवाही कार्यक्रमास मंजुरी दिल्यानंतर तात्काळ करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**संगमनेर (जि.अहमदनगर) येथे वाळू तस्करांनी नायब तहसिलदार यांच्यावर केलेला जीवघेणा हल्ला**

**(१४) * ३४४६० श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमनेर (जि.अहमदनगर) येथे वाळू तस्करी होत असल्याने कारवाई करण्यासठी गेलेल्या नायब तहसिलदार यांच्यावर दिनांक ८ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास वाळू तस्करांनी जीवघेणा हल्ला करुन त्यांना गंभीर जखमी केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत वाळू तस्करांवर अद्यापही कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनातर्फे कारवाई न झाल्याने संपूर्ण जिल्हाभर महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिनांक १० ऑगस्ट, २०१५ ते दिनांक १४ ऑगस्ट, २०१५ पर्यंत काम बंद आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधित दोषी असणाऱ्या वाळू तस्करांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) नाही.

(३) दि. १०/८/२०१५ रोजी संगमनेर महसूल विभागातर्फे अधिका-यांनी काम बंद आंदोलन केले होते. परंतू, दि. १०/८/२०१५ व दि. ११/८/२०१५ रोजी गुन्ह्यातील तीन आरोपींना अटक केल्याने आंदोलन कर्त्यांनी त्यांचे आंदोलन मागे घेतलेले आहे.

(४)सदर घटनेबाबत गुरनं १८९/२०१५ भादवि.कलम ३०७, ३९४, ३५३, ३३२, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे संगमनेर पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद केला असून आरोपी अटक करण्यात आली आहे.

सध्या आरोपी न्यायालयीन कोठडीमध्ये असून त्यांच्या विरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**शिरपूर (ता. देवरी, जि.गोंदीया) चेक पोस्ट सीमा तपासणी नाका येथील प्राधिकृत कंपनीच्या कामात अनियमितता असल्याबाबत**

**(१५) * ३५३७८ श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदीया जिल्ह्यातील तालुका देवरी राष्ट्रीय महामार्ग क्र.६ वरील शिरपूर चेक पोस्ट सीमा तपासणी नाक्याचे कंत्राट सदभाव ग्रुप यांना दिले असून सदर कंपनीच्या कामात अनियमितता असल्यामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कंत्राटदारांनी स्थानिक युवकांना कार्यालयीन कामानिमित्त रोजगार न देता बाहेरील युवकांना रोजगार देऊन, नक्षलग्रस्त भागात रोजगार दिला नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदभाव ग्रुप कंपनीवर कारवाई करुन सदर कंपनीला काळया यादीत समाविष्ट करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) सदर सीमा तपासणी नाक्याचे आधुनिकीकरण महाराष्ट्र बॉर्डर चेक पोस्ट नेटवर्क लि.यांच्यातर्फे प्राधिकृत मे.सदभाव कंपनीद्वारे करण्यात आले असून सदर कंपनीच्या कामातील अनियमिततेमुळे शासनाचा महसूल बुडत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) हे खरे नाही

नाक्यावर नियुक्त केलेल्या कर्मचा-यांपैकी ५०% पेक्षा जास्त पदावर स्थानिक युवकांना सेवापुरवठादारामार्फत नेमण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

**मुंबईमध्ये बेस्ट मार्फत पुरविण्यात येणा-या वीजेच्या वाढीव बिलाबाबत**

**(१६) * ३२२०२ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील बेस्टच्या १० लाख ग्राहकांना गेल्या ९ महिन्यांत ४ वेळा जादा रक्कमेची वीज बिले आली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संगणकीय वीज बिल तयार करण्यासाठी बेस्ट ने हे कंत्राट के.एल.जी या कंपनीला ५० कोटी रुपयांना देऊन वीज बिल प्रणाली बसविणे, बेस्टच्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे व ही प्रणाली बेस्ट ला सुपूर्द करणे अपेक्षित असतानाही अदयापपर्यंत ही प्रणाली हस्तांतरित करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सर्वसामान्य मुंबईकर जनतेच्या वीज बिलामध्ये येणाऱ्या वाढीव वीज बिलाला आळा घालण्यासाठी शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली असून ज्या कंपनी मार्फत अशी चुकीची बिले ग्राहकांना दिली आहेत त्या कंपनीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.
(२) बेस्ट उपक्रमाकडून मे. के. एल. जी. या संस्थेला वीज बिल तयार करण्याच्या कामाचे कंत्राट दिनांक ६.११.२००७ रोजी देण्यात आले. या संस्थेने, आर्थिक कारणास्तव प्रवर्तन आणि देखभालीची सेवा पुरविण्याविषयी असमर्थता दाखविल्यानंतर हे कंत्राट मुदतीपूर्वी बंद करण्यात आले व त्याच अटी आणि शर्ती कायम ठेवून प्रवर्तन आणि देखभालीची सेवा पुरविण्याकरीता मे. त्वस्तर या व्यवसाय संस्थेस दिनांक २.५.२०१३ रोजी नविन कंत्राट दिले. सदर प्रणालीचे प्रवर्तन व देखभाल या संस्थेमार्फत सध्या करण्यात येते. या संस्थेने, कंत्राटाच्या अटी व शर्तीनुसार बेस्ट उपक्रमाच्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना त्यांनी तयार केलेल्या प्रणालीचे प्रवर्तन करण्याकरीता आवश्यक प्रशिक्षण (Operational Training) दिले आहे. पण सदर प्रणालीचे अंर्तभूतीकरण (Internalisation) करण्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण देणे हा कंत्राटाचा भाग नव्हता. तथापि प्रणाली आत्मसात करून ताब्यात घेणे तसेच नविन प्रणाली तयार करण्याचे काम बेस्ट उपक्रमांतर्गत कार्यरत असलेला माहिती तंत्रज्ञान विभाग करीत आहे.
(३),(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**आष्टी (जि.वर्धा) तालुक्यातील बोरगाव (टुमनी) येथे**
**गोहनातील गायीना विषबाधा झाल्याबाबत**

**(१७) * ३०५७९ श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी (जि.वर्धा) तालुक्यातील बोरगाव (टुमनी) येथे गोहनातील १० गायीना विषबाधा झाली असून त्यातील ४ गायींचा मृत्यू झाला असल्याचे दिनांक १३ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोरगावचे श्री.ज्ञानेश्वर निंभोरकर यांच्याकडील ६ गायींची प्रकृती गंभीर आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मृत पावलेल्या गायींसाठी शेतकऱ्याला नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नसुन, श्री. ज्ञानेश्वर निंभोरकर यांच्याकडील ६ गायींची प्रकृती उपचारानंतर चांगली झाली आहे.

(३) व (४) होय.

विषबाधेने जनावरांचा मृत्यु होणे ही बाब नैसर्गिक आपत्तीमध्ये मोडत नसल्याने, मृत जनावरांच्या मालकांना नुकसान भरपाई देय होत नाही.

-----------------

**महावितरणाची फ्रॅन्चायझी कंपनीकडे थकलेल्या कोट्यवधी**
**रक्कमेची वसूली करण्यास होत असलेल्या विलंबाबाबत**

**(१८) * ३२४४२ श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वीज ग्राहकांना चांगल्या सेवा देण्याबरोबरच वीज बील वसूली आणि गळती रोखण्यासाठी महावितरणाने जळगाव येथील क्रॉम्प्टन ग्रिव्हस या कंपनीला फ्रॅन्चायझी दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीजकामगारांचा विरोध असतांनाही भिवंडी, जळगाव, औरंगाबाद आणि नागपूर येथे खाजगी कंपन्यांना फ्रॅन्चायझी दिली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्राहकांकडून या कंपनीच्या कारभाराबाबत तक्रारी आल्यामुळे व महावितरणचे ९९ कोटी रुपये जळगावच्या फ्रेन्चायझीने थकविल्यामुळे जळगांव फ्रॅन्चायझी दिनांक १० ऑगस्ट, २०१५ रोजी रद्द केली तर ६ महिन्यांपूर्वी ८० कोटी थकल्यामुळे औरंगाबाद येथील जीटीएलचीही फ्रॅन्चायझी रद्द केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महावितरणचे फ्रॅन्चायझी धोरण फसल्यामुळे सदरहू फ्रॅन्चायझी कंपन्याकडे थकलेली कोट्यवधी रुपयांची रक्कम विनाविलंब वसूल करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) महावितरण कंपनीने सदर वितरण फ्रॅन्चाइझी सोबतचे करार रद्द केले असून करारातील तरतुदीनुसार अंतिम हिशेबपूर्तीचे काम सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कृषी महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणा-या आर्थिक दृष्ट्या दुर्बल कृषी विद्यार्थ्यांना ईबीसी सवलत वितरीत झाली नसल्याबाबत

**(१९) * ३३९१३ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणा-या आर्थिक दृष्ट्या दुर्बल कृषी विद्यार्थ्यांना महाराष्ट्र कृषी शिक्षण परिषदेच्या विलंबामुळे ईबीसी सवलत वितरीत झाली नसल्याचे दिनांक २० ऑक्टोंबर, २०१५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने कृषी विद्यार्थ्यांचे सन २०११-१२ पासून रखडलेले १८ कोटी रुपये अनुदान महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेकडे वर्ग केले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेकडून दिनांक २० ऑक्टोंबर, २०१५ पर्यंत हा निधी कृषी विद्यापीठाकडे वितरीत झाला नसल्याने राज्यभरातील कृषी विद्यार्थी ईबीसी सवलती पासुन वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू निधी कृषी विद्यापीठाकडे वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) राज्यातील कृषि महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणा-या आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रतिपूर्तीची रक्कम शासनाकडून कृषि परिषदेकडे वितरीत केली जाते. सदर रक्कम कोषागारातून आहरीत करुन कृषि विद्यापीठांना वाटप करण्याची कार्यवाही महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेकडून करण्यात येते. सन २०१५-२०१६ करीता कृषि विद्यापीठांतर्गत ईबीसी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रतिपूर्तीसाठी रु.८.०० कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे. त्यापैकी वित्त विभागाच्या दिनांक १७/४/२०१५ च्या परिपत्रकानुसार नोव्हेंबर २०१५ पर्यंतच्या कालावधीसाठी ७०% मर्यादेत रु.५.६० कोटी इतके अनुदान माहे जुलै २०१५ मध्ये महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेमार्फत कृषि विद्यापीठांना वितरीत करण्यात आले आहे.तसेच ईबीसी विद्यार्थ्यांच्या सन २०११-१२ ते २०१४-१५ या कालावधीत प्रलंबित शैक्षणिक प्रतिपूर्तीसाठी विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात रु.१०.०० कोटी इतके अनुदान पुरवणी मागणीव्दारे मंजूर करण्यात आले आहे. त्यापैकी ७०% मर्यादेत रु.७.०० कोटी इतके अनुदान वित्त विभागाच्या मान्यतेने माहे ऑक्टोबर २०१५ मध्ये कृषि परिषदेकडे वितरीत करण्यात आले.सदर अनुदान कोषागारातून आहरीत करुन कृषि विद्यापीठांकडे वाटप करण्याची कार्यवाही कृषि परिषदेकडून करण्यात येत आहे.उर्वरित अनुदान वित्त विभागाच्या मान्यतेने महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेला वितरीत करण्याबाबत शासन स्तरावरुन कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवीन शेवा (ता.उरण, जि.रायगड) या गावाच्या पुनर्वसनाबाबत**

**(२०) * २८७१७ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवीन शेवा (ता.उरण, जि.रायगड) या गावाचे पुनर्वसन जेएनपीटी बंदरासाठी करण्यात आले आहे, त्यावेळेस सदर ग्रामस्थांना ३३.६४ हेक्टर जमीन देण्याचे मंजूर

करण्यात आले त्याची संपूर्ण रक्कम शासनास जेएनपीटीने अदा केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संपूर्ण रक्कम अदा केलेली ३३.६४ हेक्टर जमीन नवीन शेवा या गावातील प्रकल्पग्रस्तांना दिली नसल्याने त्यांच्याकडून वारंवार आंदोलने करण्यात येत आहेत सदर प्रश्न मार्गी लावण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी वारंवार शासनाकडे निवेदनाद्वारे मागणी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी ३३.६४ हेक्टर जमीन नवीन शेवा या गावातील प्रकल्पग्रस्तांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) नवीन शेवा गावाच्या पुनर्वसनासाठी देण्याकरीता ३१.०१.५ हेक्टर आर जमीन संपादीत करुन तिचा ताबा सिडको ला देण्यात आला होता. तथापि सिडको कडे हस्तांतरीत करण्यात आलेल्या क्षेत्रापैकी प्रकल्पग्रस्तांना भुखंडासाठी ४.९७.०१ हे. आर क्षेत्राचे वाटप करण्यात आले आहे. तथापि तसेच नागरी सुविधांसाठीचे क्षेत्र ५.५१.४९ हे. आर आहे. मुळ १५.०५.१९८६ च्या निर्णयानुसार जमीन देण्याची मागणी प्रकल्पग्रस्तांकडुन होत आहे व त्यानुसार नवीन शेवा गावातील प्रकल्पग्रस्तांना भुखंड देण्यासाठी १०.३५.८६ हे.आर आणि नागरी सुविधा साठी ५.५१.४९ हे. आर असे एकूण १५.८६.८७ हे.आर. क्षेत्र आवश्यक असुन सिडको कडे हस्तांतरीत करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील वणी व मोरगांव तालुक्यात महावितरणतर्फे घरगुती ग्राहकांना भरमसाठ वीज देयक पाठविल्याबाबत

**(२१) * ३७१०४ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील वणी व मोरगांव तालुक्यात महावितरणकडून घरगुती ग्राहकांना १० ते २० हजार रुपयांचे भरमसाठ वीज देयक पाठविल्याचे दिनांक १६ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांना अनियमित वीज पुरवठा केल्याने शेतकरी चिंताग्रस्त झालेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने भरमसाठ वीज देयके पाठविणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, ग्राहकांना १० ते २० हजार रुपयांची पाठविलेली देयके कमी करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्या येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) महावितरण कंपनीकडून या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे.

(४) चुकीचे रिडींग घेणाऱ्या कंत्राटदाराचे काम महावितरण कंपनीकडून बंद करण्यात आले असून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.

(५) महावितरण कंपनीने ग्राहकांची संचयीत बिले दुरुस्त करुन दिली आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**एरंडोल (जि. जळगांव) तालुक्यात शेती उपयोगी सर्व साहित्य मुदत संपल्यानंतर देखील कृषि अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे गोदामातच पडून असल्याबाबत**

**(२२) * ३२९३१ डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांसाठी कृषि अवजारे विविध प्रकारचे किटकनाशके औषधी, शेती उपयोगी साहित्य यावर करोडो रुपये खर्च होत असून एरंडोल (जि. जळगांव) तालुक्यात शेती उपयोगी वरील सर्व साहित्य मुदत संपल्यानंतर देखील कृषि अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे गोदामातच पडून असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषि अधिकाऱ्यांच्या गैरजबाबदारपणामुळे शेतकऱ्यांचे साहित्य वाटप न झाल्याने अनेक योजनांपासून त्यांना वंचित राहवे लागले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार सदर दोषी अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) सन २०१३-१४ ते सन २०१५-१६ पर्यंत विविध याजेनांतर्गत प्राप्त झालेले विविध कृषोपयोगी साहित्य गोदामात शिल्लक आढळलेले आहे.

(२), (३), (४) व (५) संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी सुरु करण्यात आलेली आहे.

-----------------

**चिपळूण तालुक्यातील खेर्डी येथे शासनाच्या भूखंडावर बेकायदेशीररित्या बंगले बांधल्याबाबत**

**(२३) * ३५२२४ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण तालुक्यातील खेर्डी येथे असलेल्या शासनाच्या २१ गुंठे भूखंडावर शासनाची परवानगी न घेता बेकायदेशीररित्या रहिवासी बंगले बांधले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित अधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे सदर बांधकाम राजरोसपणे सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, सदर चौकशीअंती बेकायदेशीररित्या केलेले बंगल्याचे बांधकाम पाडण्याबाबत तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे आहे.

तथापि, सदर बाब सप्टेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आली नसून जून, २०१५ मध्ये निदर्शनास आली आहे.

(२) हे खरे नाही.

सदर ठिकाणी असलेल्या इमारतीची/घराची चालू असलेली बांधकामे थांबविण्यात आली असून सदरची जमीन मिळकत व त्यामध्ये असलेली बांधकामे शासनाचे ताब्यात घेण्यात आली आहेत.

(३) होय.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या आगारातील डिझेलच्या टाकीतून डिझेलची चोरी होत असल्याबाबत**

**(२४) * २८४१७ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या २५० आगारांपैकी ७५ आगारांमधील भूमिगत टाक्यांमध्ये १ लाख ८० हजार लिटर डिझेल दक्षता विभागाच्या चौकशीत कमी आढळून आल्याने, एस.टी. महामंडळाने राज्याच्या वैद्यमापन शास्त्र विभागाला (एल.एम.ओ) या सर्व प्रकाराची चौकशी करण्याची विनंती केल्याची बाब दिनांक २५ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर जिल्ह्याच्या निलंगा येथील बस आगारास इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. चा एक टँकर चालक डिझेल चोरी करताना पकडला गेला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एस.टी. महामंडळाचे मुख्य दक्षता अधिकारी श्री.विनीत अगरवाल यांनी एलएमओ चे प्रमुख श्री.संजय पांडे यांना पाठविलेल्या पत्रात चौकशी करण्याबाबत केलेल्या विनंतीमध्ये कोणकोणत्या प्रमुख बाबींचा समावेश करण्यात आला आहे,

(४) असल्यास, त्यानुसार एलएमओ ने चौकशी पूर्ण केली असल्यास चौकशी अहवाल एस.टी. महामंडळाला सादर केला आहे काय,

(५) असल्यास, चौकशी अहवालाचे निष्कर्ष काय आहेत, त्यामध्ये दोषी आढळलेल्या व्यक्तींविरुध्द एस.टी. महामंडळाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२), (३), (४) व (५) सुरक्षा व दक्षता खात्यामार्फत राज्य परिवहन महामंडळाच्या विविध आगारातील भूमिगत टाकीतील डिझेल कमतरतेच्या अनुषंगाने माहिती संकलित केली असता ७५ आगारातील भूमिगत डिझेल टाकित ५०० लिटर व त्यापेक्षा जास्त लिटर डिझेल कमी असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार याबाबतची तपासणी करुन उचित कार्यवाही करण्याबाबत नियंत्रण, वैद्यमापन शास्त्र यांना राज्य परिवहनद्वारा कळविण्यात आले असून त्याबाबतचा तपासणी अहवाल राज्य परिवहन महामंडळाकडे प्राप्त झालेला नाही.

दि.१७/६/२०१५ रोजी निलंगा आगारास हिंदुस्थान पेट्रोलियम,पाखणी, सोलापूर येथून डिझेल पुरवठा करणारी क्र.एमएच-२३-३६६७ या टँकरमध्ये छुपी टाकी बसवून डिझेल चोरी करत असल्याचे निदर्शनास आल्यावरुन सदर चालक /मालका विरुध्द निलंगा पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ७३/१५ भा.दं.वि.३७९, ४०६, ४०७, ३४ अन्वये दि.१८/७/२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाडा विभागात सप्टेंबर ते ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत वीज कोसळून ८२ जणांचा झालेला मृत्यु

**(२५) * ३०६८७ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा विभागात सप्टेंबर ते ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान वीज कोसळून ८२ जणांचा मृत्यु झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज कोसळुन मृत्यु होण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी वीज रोधक यंत्राणा बसविण्याचे आदेश ७ वर्षापुर्वीच शासनाने दिले आहेत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाचा निर्णय असतानाही वीज रोधक यंत्रणा बसविण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, वीजरोधक यंत्रणा न बसविण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, याप्रकरणी दोषी अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत तसेच वीजरोधक यंत्रणा बसविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) औरंगाबाद विभागात माहे सप्टेंबर ते ऑक्टोबर,२०१५ या कालावधीत वीज कोसळून ५१ जणांचा मृत्यु झाला आहे.

(२),(३),(४) व (५) वीज अटकाव यंत्रणा प्रायोगिक तत्वावर उभारण्याबाबतच्या दि.०९/०५/२००८ व दि. १२/०६/२००९ रोजीच्या शासन निर्णयांच्या अनुषंगाने औरंगाबाद विभागात २८ ठिकाणी वीज रोधक यंत्रणा बसविण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उल्हासनगर व ठाणे शहरातून केबल जोडण्यांपासून शासनास कमी महसूल मिळत असल्याबाबत

**(२६) * २९०३० श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) शहराची लोकसंख्या सुमारे ७ लाखाच्या आसपास असून तेथील १२६ केबल चालकांनी त्यांच्याकडील फक्त ४२,३२२ केबल जोडण्या दाखवून शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल चुकविल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, ठाणे (जि.ठाणे) शहराची लोकसंख्या जास्त असून केबल जोडण्या कमी दाखवून शासनाचा करोडो रुपयाचा महसूल चुकविल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या वतीने सन २००६ नंतरच्या केबल चालकांचा सर्व्हे करण्यात आलेला नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अनधिकृत केबल चालकांवर व शासनाचा महसूल चुकविणाऱ्या केबल चालकांकडून दंड वसूल करण्याबाबत व त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) उल्हासनगर महानगर पालिका क्षेत्रामध्ये १२६ केबल चालकांनी ४२,३६३ केबल जोडण्या घोषित केलेल्या आहेत. तथापि, शासनाच्या दि.२६/०३/२०१५ च्या शासन परिपत्रकान्वये केलेल्या विनाक्रम सर्व्हेक्षणामध्ये केबल चालकांनी घोषित केलेल्या व प्रत्यक्षात असलेल्या केबल जोडण्यांमध्ये फरक असल्याचे आढळून आल्यामुळे उल्हासनगर शहरातील केबल जोडण्यांची प्रत्यक्ष संख्या केबल चालकांनी घोषित केलेल्या संख्येपेक्षा जास्त असण्याची दाट शक्यता आहे.

केंद्र शासनाच्या केबल जोडण्यांच्या डिजिटायझेशनच्या कार्यक्रमानुसार उल्हासनगर महानगर पालिकेतील केबल जोडण्यांच्या डिजिटायझेशनचा कार्यक्रम दिनांक ३१/१२/२०१५ पर्यंत पुर्ण होणे अपेक्षित असून, त्यानंतर उल्हासनगर शहरात अस्तित्वात असलेल्या केबल जोडण्यांची वस्तूनिष्ठ संख्या निश्चित होऊ शकेल.

ठाणे शहरात केबल जोडण्यांच्या डिजीटायजेशनच्या कार्यक्रमापूर्वी १,०२,०५२ इतक्या केबल जोडण्या होत्या. डिजीटायजेशनच्या कार्यक्रमानंतर १,६७,७२३ इतक्या केबल जोडण्या असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३), (४) व (५) शासनाच्या दि.२६/०३/२०१५ च्या परिपत्रकातील सूचनेनुसार विभागीय आयुक्तांच्या कार्यालयात दरमहा होणाऱ्या सोडतीमध्ये विनाक्रम निवडण्यात येणाऱ्या केबल चालकांच्या केबल जोडण्यांचे सर्व्हेक्षण करण्यात येत असून, अशा सर्व्हेक्षणामध्ये आढळून येणाऱ्या जास्तीच्या केबल जोडण्यांवर महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमातील तरतुदींनुसार दंडनीय कारवाई करुन करमणूक शुल्क वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर जिल्हयात "शेतीमाल तारण कर्ज"**
**योजनेंतर्गत निधीचे वाटप न झाल्याबाबत**

**(२७) * ३४३५० डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या कृषि पणन मंडळाच्या वतीने राबविल्या जात असलेल्या "शेतीमाल तारण कर्ज" योजनेंतर्गत सुमारे २०० कोटी रुपयांचा निधी पडून राहिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्हयातील चारही बाजार समित्याकडून गेल्या १० वर्षात एकही प्रस्ताव पाठविण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या निधीचे वाटप न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या निधीचे वाटप तातडीने करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ सन १९९०-९१ पासुन स्वनिधीमधून "शेतमाल तारण कर्ज योजना" राबवत आहे. पणन मंडळाच्या या योजनेसाठी पणन मंडळास राज्य शासनाकडून कोणत्याही स्वरुपाचा निधी दिलेला नाही. त्यामुळे निधी पडून राहण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) होय.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाची शेतमाल तारण कर्ज योजना राज्यातील बाजार समित्यांचे माध्यमातुन राबविण्यात येते. या योजनेत शेतक-यास कृषी उत्पन्न बाजार समितीने शेतमाल तारण कर्ज दिल्यानंतर कृषी उत्पन्न बाजार समिती त्या कर्जाएवढी रक्कम पणन मंडळाकडे मागणी करते. मात्र सदर योजनेनुसार कृषि उत्पन्न बाजार समिती योजनेत सहभागी झाल्याशिवाय शेतक-यास तारण कर्ज वाटप करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात शेतीला शाश्वत सिंचन उपलब्ध व्हावे यासाठी एक लाख विहिरी आणि पन्नास हजार शेततळी निर्माण करण्याबाबत**

**(२८) * २९२५६ डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतीला शाश्वत सिंचन उपलब्ध व्हावे यासाठी एक लाख विहिरी आणि पन्नास हजार शेततळी निर्माण करण्याच्या कार्यक्रमास दिनांक १५ ऑगस्ट, २०१५ रोजी पासून प्रारंभ करण्यात येणार आहे अशी घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे स्वरुप काय आहे व आतापर्यंत किती शेतकऱ्यांच्या शेतात विहिरींची व शेततळ्यांची कामे घेण्यात आली आहेत,

(३) असल्यास, एक लाख विहीरी व पन्नास हजार शेततळी निर्माण करण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशन २०१५ मध्ये विधानसभेत मा. मुख्यमंत्री महोदय यांनी पुढील तीन वर्षामध्ये एक लाख विहीरी व दरवर्षी पन्नास हजार याप्रमाणे दीड लाख शेतमळी तयार करण्यात येणार असल्याची घोषणा केलेली आहे.

(२) व (३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत दिनांक १७ डिसेंबर, २०१२ च्या शासन निर्णयानुसार सिंचन विहरी घेण्यात येतात. त्यानुसार पात्र लाभार्थ्यास रु. ३ लक्ष / विहीर इतकी रक्कम अनुज्ञेय आहे. शासन परिपत्रक क्र. मग्रारो-२०१५/प्र.क्र.८३/मग्रारो-१, दिनांक ३१ जुलै, २०१५ अन्वये पुढील तीन वर्षामध्ये घ्यावयाचा एक लाख विहिरींबाबतच्या नियोजनाचे विभागनिहाय उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार सन २०१५-१६ या वर्षाकरिता ३०,००० विहिरी पूर्ण करण्याचे नियोजित असून सद्य:स्थितीमध्ये २६,१६९ विहिरी पूर्ण झालेल्या आहेत.

शेततळी घेण्यासंदर्भात धोरणाबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अकोला जिल्हयात राज्य बियाणे महामंडळ (महाबीज) कंपनीकडून घेतलेले बियाणे न उगवल्याने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत**

**(२९) * ३५०३५ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयात राज्य बियाणे महामंडळ (महाबीज) कंपनीकडून गत खरीप हंगामात घेतलेले बियाणे न उगवल्याने शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या नुकसान भरपाईची १८ शेतकऱ्यांना हक्काचे सात लाख रुपये मिळाले नसल्याची तक्रार माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय

(३)असल्यास, चौकशीनुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) बियाणे न उगवल्याप्रकरणी महाबीजने द्यावयाच्या नुकसान भरपाईची रक्कम न मिळाल्याबाबत एका शेतकऱ्याने महाबीजकडे तक्रार केलेली होती, हे खरे आहे.

(२) होय,

(३) चौकशीत निष्पन्न झाले की, शेतक-यांच्या नुकसानभरपाईचे रु.१८.१८ लक्ष रकमेचे एकूण ५७ धनादेश परस्पर महाबीज कर्मचारी पतसंस्थेच्या खात्यात जमा करून गैरव्यवहार करण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने सहायक क्षेत्र अधिकारी यांना निलंबीत करण्यात आलेले असून त्यांचे विरूध्द सिव्हील लाईन, पोलीस ठाणे अकोला येथे गु.नों.क्र.३०३/१५ अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पोलीस तपास चालू आहे. तसेच, महाबीजने नियुक्त केलेल्या चौकशी पथकामार्फत अधिक चौकशी चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हयातील पूर्णा नदीच्या पात्रातून वाळूचे उत्खनन होत असल्याबाबत

**(३०) * २९८५२ श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील पूर्णा नदीच्या पात्रातून मोठया प्रमाणात वाळूचे उत्खनन होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी महसूल विभाग व प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून या प्रकरणाकडे जाणीव पूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अवैधरित्या वाळूचे उत्खनन करणाऱ्या दोषी वाळू माफियांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अकोला जिल्हयातील पूर्णा नदीपात्रातून वाळूचे अवैध उत्खनन होत असल्याची काही प्रकरणे दृष्टोत्पतीस आली आहेत.

(२), (३) व (४) गौण खनिजाच्या अवैध उत्खनन / वाहतुकीस आळा घालण्यासाठी अकोला जिल्ह्यात महसूल विभाग व परिवहन विभागाच्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या भरारी पथकांची स्थापना करण्यात आली असून, सदर पथकांमार्फत जिल्हयात नियमित तपासण्या करण्यात येतात. सदर पथकांनी एप्रिल, २०१५ ते ऑक्टोबर

२०१५ या कालावधीत केलेल्या तपासणीत वाळूच्या अवैध वाहतूकीच्या १८१ प्रकरणात रु.२२,१८,०००/- एवढा दंड वसूल करण्यात आला असून, ११ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यावरून सदर प्रकरणी महसूल व परिवहन विभागाचे अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील खाडीतून अनधिकृतरित्या रेती उपसा होत असल्याबाबत**

**(३१) * ३७००० श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील पिंपळास खाडी, कवळी खाडी, काल्हेर खाडी, केवणी-दिवे खाडी, खारबाब खाडी व वडुळा घर खाडी या मुख्य खाडीतून मोठ्या प्रमाणावर अनधिकृतरित्या रेती उपसा करुन खुलेआम साठवणूक करुनही भिवंडी महसूल खात्यातील उप विभागीय अधिकारी, तहसिलदार व इतर अधिकारी यांनी कोणतीही कारवाई न केल्याने शासनाचे रॉयल्टी स्वरुपातील कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अवैध रेती साठवणूक करणाऱ्यांवर जिल्हाधिकारी, ठाणे यांनी तात्काळ कारवाई करण्याबाबत भिवंडी महसूल विभागाला आदेश दिल्यानंतर भिवंडी उप विभागीय अधिकारी, तहसिलदार व इतरानी ८७१ ब्रास रेती जप्त केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी अवैधपणे रेतीसाठा करणाऱ्या संबंधित दोषींवर व या प्रकरणी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या व शासनास होणाऱ्या कोट्यवधी रुपयांच्या रॉयल्टीच्या नुकसानीस जबाबादार असणाऱ्या उप विभागीय अधिकारी, भिवंडी व तहसिलदार, भिवंडी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) प्रश्नात नमूद केलेल्या खाडीपात्रात अवैध वाळू उत्खननाची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत.
(२) जिल्हाधिकारी ठाणे यांनी दिलेल्या आदेशानुसार दिनांक ३०.९.२०१५ रोजी भिवंडी येथील रेती बंदरांना भेट देवून केलेल्या तपासणीत एकूण ८७१ ब्रास वाळूसाठा जप्त करण्यात आला आहे.

(३) प्रश्न भाग १ व २ मध्ये नमूद केलेल्या खाडीपात्रातील वाळूच्या अवैध उत्खननाबाबत दि.०१.०४.२०१५ ते दि.३०.११.२०१५ या कालावधीत ६५ तपासण्या करून, तपासणीमध्ये अवैध उत्खनन आढळून आलेल्या प्रकरणात वाळूसाठा व यंत्रसामुग्री जप्त करण्यात आली असून, अज्ञात व्यक्तींविरूध्द ७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**माजलगांव (जि. बीड) व सांगोला (जि.सोलापूर) तालुक्यातील शेतकऱ्यांचे बँक खाते नसल्यामुळे त्यांचे दुष्काळी अनुदान वर्ग न केल्याबाबत**

**(३२) * २९७१६ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजलगांव (जि.बीड) तालुक्यातील ७३८६ शेतकऱ्यांचे व सांगोला (जि.सोलापूर) तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांचे गारपीट व दुष्काळी खरीप पिकांचे २०१४ चे अनुदान शेतकऱ्यांचे बँक खाते नसल्यामुळे पडुन असल्याची माहिती माहे ऑगस्ट, २०१५ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच बँकेमध्ये खाते असणाऱ्या शेतकऱ्यांच्या खात्यांवर दुष्काळी अनुदान रक्कम वर्ग करण्यात येऊन देखील केवळ बँकेच्या गलथान कारभारामुळे उक्त तालुक्यातील शेतकऱ्यांना ही मदत अद्याप मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त भाग (१) व (२) विषयी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नंतर सदरच्या तालुक्यातील शेतकऱ्यांना दुष्काळी अनुदान त्वरीत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

शेतकऱ्यांची बँक खाती उपलब्ध नसल्यामुळे त्यांचे खात्यावर रक्कम वर्ग करता आली नाही.

(३) व (४) बँक खाते उपलब्ध नसलेले ७३८६ शेतकऱ्यांची बँक खाती उघडण्याकरिता तलाठी, मंडळ अधिकारी व बँक व्यवस्थापक यांची बैठक घेऊन बँक खाती नसलेल्या शेतकऱ्यांची खाती तातडीने उघडण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यानुसार माहे ऑक्टोबर २०१५ अखेर सर्व बाधित शेतकऱ्यांची खाती उपलब्ध करुन घेवून त्यांचे बँक खात्यावर अनुदान वितरीत करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर शहरातील ताडी दुकानांच्या परिसरात ताडी पिऊन तिघांचा संशयास्पद झालेला मृत्यू

**(३३) * ३३३४७ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर शहरातील ताडी दुकानांच्या परिसरात ताडी पिऊन तिघांचा संशयास्पद मृत्यू झाला असून याबाबत शवविच्छेदन अहवाल मागविला असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१५ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी रासायनिक ताडीचा अंश आढळून आल्यास संबंधित दुकानांचे परवाने रद्द करणार असल्याचे जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी जाहिर केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दुकानांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अशी कोणतीही बाब शासनाच्या निदर्शनास आलेली नाही.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पेण (जि.रायगड) येथील तहसील कार्यालयातील कारकूनाने**
**वाळू उपसासाठी बनावट परवाने तयार केल्याबाबत**

**(३४) * ३२०२८ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) तहसील कार्यालयामधील कारकून श्री.ज्ञानेश्वर बोडके यांनी वाळू उपसा करण्यासाठी बनावट परवाने तयार केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २ जुलै, २०१५ रोजी श्री.ज्ञानेश्वर बोडके यांनी केलेल्या बनावट परवान्यानुसार १५० ब्रास वाळू मुंबईतील शिवडी ठाण्याचे पोलीस निरीक्षक पिकेकर यांच्या पथकाने जप्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीअंती दोषी असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी शिवडी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ६६/२०१५ अन्वये दिनांक २.७.२०१५ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. याप्रकरणी आरोपीस अटक करण्यात आली असून त्यांना सध्या पोलीस कस्टडी देण्यात आली आहे. जिल्हाधिकारी, रायगड यांनी दि. २२.७.२०१५ च्या आदेशान्वये श्री. बोडके यांना दि. १०.७.२०१५ पासून शासकीय सेवेतून निलंबित केलेआहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**साक्री (जि.धुळे) तालुक्यातील माळमाथा परिसरातील दुसाणे**
**गावात गौण खनिजाची चोरी होत असल्याबाबत**

**(३५) * ३१२२६ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (जि.धुळे) तालुक्यातील माळमाथा परिसरातील दुसाणे गावात गौण खनिजाची मोठया प्रमाणात चोरी होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात  निदर्शनास आले हे खरे आहे काय

(२) तसेच, सदर खनिजाची वाहतूक करणारी वाहने वेगाने जात येत असल्याने अपघाताची संख्या मोठया प्रमाणात वाढली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर गावात होत असलेली गौण खनिजाची चोरी थांबविणेबाबत तसेच अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) साक्री तालुक्यातील माळमाथा परिसरातील दुसाणे गावात गौण खनिजाची चोरी होत असल्याची तसेच गौण खनिजाच्या वाहनामुळे अपघात होत असल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील अतिदुर्गम बंदी भागातील सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत गौण खनिजांचे उत्खनन केल्याबाबत

**(३६) * ३१९७९ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील अतिदुर्गम बंदी भागातील सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत रस्त्याकरिता महसूल विभागाचा कोणताही परवाना न काढता गौण खनिजांचे अवैध उत्खनन व वाहतूक केल्याप्रकरणी संबंधित ठेकेदाराला दिनांक २२ सप्टेंबर, २०१५ च्या सुमारास ३९ लाख रुपयांचा दंड आकारण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दंड वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बांधण्यात येणाऱ्या रस्त्याच्या कामाकरीता संबंधित ठेकेदाराने मौजे गाडी (बोरी) व थेरडी येथुन विनापरवानगी ८९८ ब्रास गौणखनिजाचे उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यावरुन तहसिलदार उमरखेड यांनी दि.१४.०९.२०१५ रोजी रु. ३९,५१,३१५/- एवढ्या रकमेचे दंडाचे आदेश पारित केले आहेत. सदर आदेशाविरुध्द संबंधित ठेकेदाराने उपविभागीय अधिकारी, उमरखेड यांच्याकडे अपील अर्ज दाखल केला आहे. सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी उमरखेड यांनी दि. २८.१०.२०१५ रोजी तहसिलदार उमरखेड यांच्या आदेशास स्थगिती दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वडगांव हवेली, संजयनगर-शेरे पाडळी केसे, सुर्ली शेणोली, नांदलापुर (ता.कराड, जि.सातारा) येथे दगड खाणीमध्ये अवैधरित्या ब्रास दगडाचे उत्खनन केल्याबाबत**

**(३७) * ३६३४७ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराड तालुक्यात (जि.सातारा) वडगाव हवेली संजयनगर-शेरे पाडळी केसे, सुर्ली शेणोली, नांदलापुर येथे दगड खाणीमध्ये अवैधरित्या सुमारे ३,७२,७६४ ब्रास दगडाचे उत्खनन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील ३० दगड खाण मालकांनी याच पध्दतीने बेकायदा उत्खनन केले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रांत अधिकारी, तहसिलदार यांनी रुपये ९० कोटीच्या दंडाची नोटीस दगड खाण मालकांना पाठविली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दगडखाण मालकांनी बेकायदा उत्खनन केल्याबाबत प्रांत अधिकारी व तहसिलदार यांनी लावलेली रुपये ९० कोटींच्या दंडाची रक्कम महसुली भरणा केली आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती बेकायदा उत्खनन करणाऱ्या खाण मालकांवर व त्यांना मदत करणाऱ्या संबधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३), (४) व (५) प्रश्नात नमूद केलेल्या गावातील ३० खाणपट्टाधारकांनी विनापरवानगी ३,७२,७६४ ब्रास दगडाचे उत्खनन केल्याचे आढळून आल्यामुळे, तहसिलदार कराड यांनी संबंधितांविरुद्ध दि ११/०९/२०१५ रोजी रुपये ८९,४६,३४,१७६/- एवढ्या रकमेचे दंडाचे आदेश पारित केले आहेत.

सदर दंडाच्या आदेशाविरूध्द २६ खाणपट्टाधारकांनी उपविभागीय अधिकारी कराड यांच्याकडे अपिल दाखल केले आहे.

सदर दंडाच्या रकमेच्या वसुलीसाठी तहसिलदार कराड यांनी सर्व खाणपट्टाधारकांना महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनुसार मागणी नोटीस दिली आहे.तसेच सर्व खाणी सील केल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जालना जिल्ह्यात महसूल आस्थापनेवरील तलाठी जागांसाठी घेतलेल्या लेखी परीक्षेमध्ये झालेला गैरप्रकार

**(३८) * ३३५९७ श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यात महसूल विभागातील तलाठयांच्या २३ जागांसाठी जिल्हा प्रशासनाने दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या सुमारास घेतलेल्या लेखी परीक्षांमध्ये गैरप्रकार झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे परिक्षार्थींना या परिक्षेला बसण्यापासून वंचित राहावे लागले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची तक्रार करण्यास गेलेल्या परिक्षार्थींवर पोलिसानी बेसूमार लाठीमार केला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) जालना जिल्ह्यात महसूल आस्थापनेवरील तलाठी संवर्गातील २३ जागांसाठी जिल्हा प्रशासनाने दिनांक १३.०९.२०१५ रोजी घेतलेल्या परीक्षेमध्ये गैरप्रकार झालेला नाही. मात्र परीक्षा केंद्र क्रमांक ५ मध्ये पत्त्यात "शासकीय तंत्रनिकेतन अंबड" ऐवजी "शासकीय तंत्रनिकेतन,

नागेवाडी, जालना" असा मुद्रणदोष झाल्याचे निदर्शनास आल्याने जिल्हा प्रशासनाने त्याची तात्काळ दखल घेवून नागेवाडी या परीक्षा केंद्रावर आलेल्या उमेदवारांना शासकीय तंत्रनिकेतन, अंबड येथील परीक्षा केंद्रावर जाण्यासाठी व्यवस्था केली होती. परंतू परीक्षार्थी हे जालना येथेच परीक्षा घेणेबाबत आग्रही असल्यामुळे जालना येथील औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात उमेदवारांची बैठक व्यवस्था करण्याचा निर्णय परीक्षा समितीने तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती यांनी घेतला,आणि परीक्षेचा कालावधी बदलून ११.०० ते १.०० ऐवजी १२.०० ते २.०० असा निश्चित करुन त्यानुसार लेखी परीक्षा सर्व परीक्षा केंद्रावर १२.०० ते २.०० या वेळेत सुरळीत पार पाडण्यात आली.

पोलीस अधिक्षक, जालना यांच्या दिनांक २७.११.२०१५ रोजीच्या अहवालानुसार परिक्षार्थींवर पोलीसांनी बेसुमार लाठीमार केलेला नाही. मात्र शासकीय तंत्रनिकेतन नागेवाडी येथील कॉलेजचे पायऱ्यांवर २५ ते ३० मुले, मुली यांनी इतर परीक्षार्थी यांना त्यांचे हॉलमध्ये जाऊ न देता अडथळा निर्माण केल्यामुळे पोलीस ठाणे चंदनझिरा येथे भांदवि कलम १८८ अन्वये दिनांक १३.९.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलाआहे.

तसेच झालेल्या मुद्रण दोषाबाबत जबाबदार अधिकारी/कर्मचारी व प्रवेशपत्र निर्गमित करणाऱ्या संबंधित अभिकर्ता यांचाही खुलासा मागविण्यात आलेला आहे.
संबंधित लिपिक यांचा खुलासा अमान्य करुन त्यांना दिनांक २३.०९.२०१५ रोजी निलंबित करण्यात येवून त्यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई सुरु करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**उदगीर (जि.लातूर) येथील केबल चालकांनी शासनाचा महसूल बुडविल्याबाबत**

**(३९) * ३०७६१ श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि.लातूर) येथे मागील अनेक वर्षापासून स्थानिक केबल चालकांनी महसूल विभागास कमी जोडणी दाखवून कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडविला असल्याच्या तक्रारी लोकप्रतिनीधी व अनेक सामाजिक संघटनेने माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये महसूल विभागाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूल विभागाने सदर तक्रारीच्या अनुषंगाने केबल जोडणीचा सर्वेक्षण केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडे सादर केलेला अहवाल हा बनावट असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाला फसवून कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडविणाऱ्या केबल चालकांविरुध्द शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अशा आशयाची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.१८/१०/२०१५ रोजी जिल्हाधिकारी, जि. लातुर यांचे कार्यालयात दिली आहे.
(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने केबल जोडण्याचे सर्वेक्षण करण्यात आले आहे.
(३) उदगीर तालुक्यातील केबल सर्वेक्षणाचा अहवाल शासनास सादर करण्यात आला नसल्याने प्रश्न उद्भवत नाही.
(४) सदर केबल सर्व्हेक्षणामध्ये आढळून आलेल्या अतिरीक्त जोडण्याबाबत संबधीत केबल ऑपरेटर यांच्यावर महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम, मधील तरतुदींन्वये कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांमध्ये झालेली अनियमितता व गैरव्यवहार**

**(४०) * ३४४०९ श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांमध्ये झालेली अनियमितता व गैरव्यवहाराबाबत माहे मे २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे तक्रार दाखल करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तक्रारीची शासनामार्फत चौकशी करण्यात आलेली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले वा तदनुसार शासनामार्फत संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) उक्त तक्रारीस अनुलक्षून विद्यापीठ स्तरावरुन बदल्यांबाबत वापरण्यात येणारी कार्यप्रणाली तसेच तक्रार अर्जाबाबतची वस्तुस्थिती कृषि परिषद, पुणे यांचेकडून मागविण्यात आली आहे.

(३) कर्मचा-यांच्या बदल्या ह्या महाराष्ट्र कृषि विद्यापीठ (कृषि विदयापीठे) अधिनिमय १९८३ व महाराष्ट्र कृषि विद्यापीठ (कृषि विद्यापीठे) परिनियम १९९० मधील तरतूदीनुसार मा.कुलगुरु व मा.कुलसचिव यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये करण्यात येतात. तसेच अपंग कर्मचा-यांना नियुक्त्या/बदल्या ह्या शासन नियमानुसार कर्मचा-यांना सोसीच्या ठिकाणी करण्यात येतात.

सदर तक्रार मुद्यांबाबत अधिक माहिती मागविण्यात आली आहे. त्यामुळे तुर्तास शासनामार्फत संबंधितांवर कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात पावसाच्या अनिश्चिततेमुळे दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याबाबत**

**(४१) * २८३६९ श्री.राहूल कुल (दौंड), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पावसाच्या अनिश्चिततेमुळे मराठवाड्यासह राज्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) मराठवाड्यात,पश्चिम महाराष्ट्रासह संपूर्ण राज्यात सुमारे ७ लाख गुरांना चारा मिळत नसून चाऱ्या अभावी गुरांचे हाल होऊ नये म्हणून त्यांना कडब्याच्या जागी वड व कडुलिंबाचा पाला चारुन त्याची पोटभरणी गुराखी करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनामार्फत याबातची पाहणी करण्यात आली आहे काय,

(४) असल्याच, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळावर मात करणेसाठी शासनाने अन्न धान्य, पाणी आणि जनावरांचा चारा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाशिक, औरंगाबाद व अमरावती या विभागात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) शासन निर्णय दिनांक २०.०८.२०१५ अन्वये चारा टंचाई असलेल्या बीड, लातूर व उस्मानाबाद जिल्हयातील टंचाईग्रस्त भागात जनावरांच्या छावण्या उघडण्यास परवानगी देण्यात आली आहे.

दिनांक २६.०८.२०१५ च्या शासन निर्णयान्वये टंचाई परिस्थितीत टँकरचे अधिकार तहसिलदार यांना प्रदान करण्यात आले आहेत. तसेच दिनांक ७.९.२०१५ अन्वये धरणातील पाणीसाठा पीण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत.

शासन निर्णय दिनांक ०९.११.२०१५ अन्वये सन २००१५-१६ च्या खरीप हंगामातील हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या १५७४७ गावांमध्ये दुष्काळसदृष्य परिस्थिती जाहीर करुन त्यानुषंगाने विविध उपाययोजना व सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आटपाडी (जि.सांगली) तालुक्यामध्ये निकृष्ट दर्जाच्या कापूस बियाणांचा पुरवठा करण्यात आल्याबाबत**

**(४२) * ३५९६४ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आटपाडी (जि.सांगली) तालुक्यामध्ये निकृष्ट दर्जाच्या कापूस बियाणांचा पुरवठा करण्यात आला आहे असे माहे जुलै, २०१५ च्या तिस-या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, सदर चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई मिळणेबाबत व संबंधित कंपन्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय. चौकशीत कृषिधन सीडस प्रायव्हेट लिमिटेड जालना या कंपनीच्या सुपर फायबर (KDCHB-४०७) BGI या वाणाच्या कापूस बियाणात अनुवंशिक अशुध्दता आढळून आलेली आहे.
(३) महाराष्ट्र कापूस बि-बियाणे (पुरवठा,वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) अधिनियम, २००९ व नियम २०१० खाली सुनावणी प्रगतीत आहे. सुनावणीअंती शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भात उचित निर्णय घेण्यात येईल.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हा परिषद शाळांचा वीज पुरवठा खंडीत केल्याबाबत

**(४३) * २९०५४ श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वतीने सुरु असणाऱ्या प्राथमिक शाळा आणि प्राथमिक आरोग्य केंद्रासह उपकेंद्राना महावितरणाकडून व्यावसायिक दराने वीजपुरवठा केला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, व्यावसायिक विजदराने होणाऱ्या वीजपुरवठ्या नंतर भरमसाठ येणारे लाईट बिल भरणे शक्य नसल्याने जिल्हा परिषदेकडे महावितरणाची मोठी थकबाकी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, थकबाकी न भरल्याने शाळांचा वीज पुरवठा खंडीत केला असून त्याचा विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीअंती शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही. विद्युत नियामक आयोगाचे आदेश दिनांक २६.६.२०१५ नुसार दिनांक १.६.२०१५ पासून शासकीय शैक्षणिक संस्था व इस्पितळे यांना सार्वजनिक सेवा(अ) शासकीय शैक्षणिक संस्था व इस्पितळे या वर्गवारीप्रमाणे वीज पुरवठा करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) कोल्हापूर जिल्हयातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १०२ प्राथमिक शाळा व ९ प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र यांचा वीज पुरवठा थकबाकीच्या कारणास्तव महावितरणकडून खंडीत करण्यात आला आहे.

-----------------

## पुण्यातील सिंहगड रस्त्यावरील पानमळा वस्तीत वीजेचा धक्का लागून एका लहान मुलीचा झालेला मृत्यू

**(४४) * ३६३०२ श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील सिंहगड रस्त्यावरील पानमळा वस्तीत खांबावरून वीज प्रवाह घरात शिरून सदर प्रवाहामुळे एका लहान मुलीचा मृत्यू झाला तर ५ जण जखमी झाल्याची घटना दिनांक ८ सप्टेंबर २०१५ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरहू मृत बालिकेच्या कुटूंबियांना व जखमींना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर घटनेस जबाबदार असणाऱ्या महावितरणच्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) विद्युत निरीक्षक, पुणे यांनी चौकशी केली आहे.

(३) दिनांक ८.९.२०१५ रोजी संध्याकाळी सुमारे ५.४५ च्या दरम्यान पानमळा,दत्तवाडी,पुणे येथील घरासाठी दिलेल्या सर्व्हीस वायर जीर्ण झाल्यामुळे तिचे इन्सुलेशन निघुन आतील वाहक उघडा झाला होता. तेथील सर्व घरांचे लोखंडी पत्रे एकमेकांना चिकटून असल्याने लोखंडी पत्रे व लोखंडी पाईप विद्युत भारीत झाले.

घराच्या पत्र्याला आधारासाठी वापरलेल्या लोखंडी पाईला कु.अव्दीता चंद्रकांत वाघमारे हीचा संपर्क आल्याने तिला विजेचा धक्का बसला व ती मृत झाली व इतर ५ रहिवाशांना वीजेचा सौम्य धक्का जाणवला परंतु कोणीही जखमी झाले नाही.

सदर मृत बालीकेच्या कुटुंबियांना तातडीची मदत म्हणून रु.२०,०००/- दिनांक १८.९.२०१५ रोजी महावितरण कंपनीकडून देण्यात आली आहे. उर्वरित नुकसान भरपाईची रक्कम मयताच्या वारसांनी कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर कंपनीकडून देण्यात येईल.

(४) विद्युत निरीक्षक, पुणे यांचेकडून महावितरण कंपनीला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील गोदामांमध्ये बेकायदेशीर रसायनांचा साठा होत असल्याबाबत**

**(४५) * ३७८६८ श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील गोदाम पट्यामधील काल्हेर, कशेळी, कोपर, पुर्णा, राहनाळ, वळ, दापोडा, माणकोली, गुंदवली, ओवळी, कुकसे, बोरीवली आदी ग्रामपंचायतहद्दीत गोदामांची सुसज्ज अशी बांधकामे केलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा परिसर संपूर्ण देशातील बाजार पेठांना मध्यवर्ती असल्याने जागतीक दर्जाच्या कंपनीपासून ते भंगाराच्या मालाची साठवणूक येथील गोदामांमध्ये केले जात असून या सोबतच केमिकल माफीयांचा वावरही मोठ्या प्रमाणात वाढला असून बेकायदेशीर रसायनांचा साठा येथे केला जात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, गेल्या ५ वर्षात ३८ वेळा केमिकल गोदामांमध्ये जीवघेण्या आगी लागल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तेथील केमिकल माफीया व स्थानिक पोलीस, व महसूल अधिकारी यांच्या संगनमताने बेकायदेशीर रसायनांचा साठा केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) सदर भागात विविध प्रकारची गोदामे आहेत व येथे आगीच्या घटना घडल्या आहेत हे खरे आहे.
(४), (५) व (६) या संदर्भात चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त कोकण विभाग यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

**अतिरिक्त जिल्हाधिकारी मालेगाव (जि.नाशिक) यांना लाच प्रकरणात करण्यात आलेली अटक**

**(४६) * ३७७७२ श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगावचे (जि.नाशिक) अतिरिक्त जिल्हाधिकारी यांना नांदगाव (जि.नाशिक) येथील ७५ एकर जमिनीच्या खरेदीच्या प्रकरणात ३५ लाख रुपयांच्या लाच प्रकरणी दिनांक ७ ऑगस्ट, २०१५ रोजी अटक करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांच्या विरोधात अनेक तक्रारी शासनाकडे प्राप्त झालेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी पोलीसांनी अधिक चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अतिरिक्त जिल्हाधिकारी व त्यांना मदत करणाऱ्या इतर संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) श्री. रामचंद्र बापुराव पवार, तत्का. अप्पर जिल्हाधिकारी मालेगाव, जि.नाशिक यांना लाच लुचपत प्रकरणी दिनांक ०६.०८.२०१५ रोजी २३.०० वाजता अटक करण्यात आली असता ते पोलीस अभिरक्षेत ४८ तासापेक्षा अधिक काळ राहिल्याने त्यांना अटकेच्या दिनांकापासून निलंबित करण्यात आले आहे.

सदर प्रकरणी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडून पुढील कारवाई करण्यात येत आहे.

तसेच श्री. पवार यांच्याविरुध्द शासनाकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, नाशिक यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**परभणी जिल्हयामध्ये बियाणे वाटपात झालेला गैरव्यवहार**

**(४७) * ३४७४६ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना रब्बी मोसमात मदत व्हावी म्हणून शासनाने अल्पदरात रब्बीचे बियाणे उपलब्ध करून देण्याचे ठरविले आहे हे खरे आहे काय

(२) तसेच परभणी जिल्हयामध्ये मोंढा बाजार मयत आणि शेती नसलेल्या लोकांच्या नावे बियाणे (हरभरा) उचलण्याचे अनेक गैरप्रकार माहे सप्टेंबर-ऑक्टोबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान झाले आहेत हे खरे आहे काय

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय

(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधिताविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) रब्बी हंगामातील कडधान्य, गहू व भरडधान्य आणि गळीत धान्यांच्या उत्पादकता वाढीसाठी नवीन वाणांच्या बियाणे खरेदीकरीता अनुक्रमे राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान आणि राष्ट्रीय गळीत धान्य व तेलताड अभियानांतर्गत समाविष्ट जिल्हयात, केंद्र शासनाने मंजूर केलेल्या लक्षांकाच्या मर्यादेत बियाणे खरेदीवर विहीत अनुदान देण्यात आले आहे.

(२) नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**अहमदनगर जिल्हयात पावसाने खंड दिल्यामुळे पेरणी**
**झालेल्या पिकांचे झालेले नुकसान**

**(४८) * २९६८८ श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयात महिन्याभरापासून पावसाने खंड दिल्यामुळे पेरणीनंतर खरीप हंगामातील ३ लाख २६ हजार हेक्टरपेक्षा जास्त पिकांचे नुकसान झाले, त्यामुळे खरीप पिकांचे उत्पन्न ८० ते ९० टक्के घटणार असल्याचा कृषी विभागाचा अंदाज असून सर्वच पिके जळाली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने २२६ कोटी ९८ लाख ६० हजार रुपयांचे अनुदान दिनांक २२ मे, २०१५ रोजी प्रशासनाकडे देवूनही अद्याप अनुदान शेतक-यांना मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, पाहणीअंती जिल्हा दुष्काळग्रस्त जाहिर करुन येथील शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे,

(२), (३), (४) व (५) शासन निर्णय दिनांक १६.४.२०१५ अन्वये सन २०१४-१५ च्या रब्बी अंतीम हंगामातील ५० पैशापेक्षा कमी पैशेवारी असलेल्या अहमदनगर जिल्ह्यातील ४४२ गावांमध्ये टंचाईसदृष्य परिस्थिती जाहीर करून त्याअनुषंगाने सवलती लागू करण्यात आल्या आहेत.

सन २०१४-१५ मध्ये रब्बी हंगामात दुष्काळामुळे बाधित अत्यल्प व अल्पभुधारक शेतकऱ्यांना शेतीपिकासाठी अल्पकालिन पिकांसाठी व वार्षिक पिकांसाठी मदत वितरित करण्यात आली आहे. त्यानुसार अहमदनगर जिल्हयासाठी २२६९८.६० लक्ष इतके अनुदान दिनांक २१.५.२०१५ च्या शासन निर्णयान्वये वितरित करण्यात आले आहे. त्यापैकी रूपये १५८३५.२१ लक्ष इतकी रक्कम शेतक-यांच्या खात्यावर जमा करण्यात आली आहे. रूपये २३९७.७६ लक्ष इतकी रक्कम वाटपासाठी जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्याकडे शिल्लक आहे. तसेच रूपये ४४७२.४८ लक्ष अनुदान शासनाकडे समर्पित केले आहे.

-----------------

## शासकीय दूध योजना, नागपूर मधील रोजंदारी कामगारांना सेवेत नियमित करण्याबाबत

**(४९) * ३६३२४ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय दूध योजना, नागपूर मधील कार्यरत ९४ रोजंदारी कामगारांना मागील ३० वर्षापासून नियमित करण्यात आले नसल्याबाबतची बाब दिनांक ३० ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दूध योजनेमध्ये ११० रोजंदारी कामगार कार्यरत होते त्यापैकी काही कामगारांचा मृत्यू झाला तर काही सेवानिवृत्त झाले आहेत, त्यामुळे ९४ कामगार रोजंदारीवर कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या रोजंदारी कामगारांना शासन सेवेत कायम स्वरुपी सामावून घेण्याकरीता मा.औद्योगिक न्यायालय व मा.उच्च न्यायालयानी आदेश दिले असतांना सुध्दा अद्यापपर्यंत शासनामार्फत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या रोजंदारीवर कार्यरत असलेल्या कामगारांना शासन सेवेत घेण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) सन १९८५ ते १९९९ या कालावधीत शादूयो, नागपूर येथे कामाच्या गरजेनुसार २९२ बदली रोजंदारी कामगार घेण्यात आले होते, त्यांना महिन्यातून १८ दिवस काम देण्यात येत होते, तथापि सदर बदली कामागारांच्या संघटनेनी महिन्यातून ३० दिवस काम देण्याची मागणी केल्यानुसार तत्कालीन मा. मंत्री (कामगार) यांचे समक्ष व अप्पर कामगार आयुक्त याचे निर्णयानुसार विभागाच्या मान्यतेने कामागारांपैकी ११० कामागारांना दि.२९.४.१९९९ पासून रोजंदारी कामगार म्हणून महिन्यातील ३० दिवस कामावर घेण्यात येत आहे.

(२) सद्य:स्थितीत योजनेतील ११० रोजंदारी कामगारांपैकी काही कामगारांचा मृत्यू झाला व काही कामगार सेवानिवृत्त झाल्यामुळे सध्या योजनेत ९२ कामगार रोजंदारीवर कार्यरत आहेत.

(३) शासकीय दूध योजना, नागपूर येथील रोजंदारी कामगारांना शासन सेवेत कायम स्वरुपी सामावून घेण्याबाबत मा.औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुध्द शासनामार्फत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर येथे अपिल दाखल करण्यात आले असून, सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) व (५)  सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे कार्यवाही करण्यात आली नाही.

-----------------

**माथेरान-नेरळ-कर्जत (ता.कर्जत, जि.रायगड) घाट रस्त्यावर मीनीबस सतत बंद पडत असल्याबाबत**

**(५०) * ३३५१८ श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथेरान-नेरळ-कर्जत (ता.कर्जत, जि.रायगड) घाट रस्त्यावर मीनीबस मागील २ वर्षापासून सतत बंद पडत असल्याने नागरिकांची तसेच शैक्षणिक विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माथेरान नेरळ प्रवास करणारे एकूण ४० ते ५० विद्यार्थी पासधारक असून देखील एसटी आगार कर्जत यांच्याकडून कोणतीही पर्यायी व्यवस्था न केल्यामुळे गरीब विद्यार्थ्यांना खाजगी वाहनाने प्रवास करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थी व प्रवासी संघटनेने दिनांक २ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास तहसिलदार तसेच आगार प्रशासन कर्जत यांना लेखी निवेदन दिले हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर घाट रस्त्यावर मीनीबस चालू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) नाही.

(३) होय.

(४) कर्जत आगारामार्फत कर्जत-माथेरान या मार्गावर प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून ५.३०, ८.१५, १४.१५ व १६.४५ या चार फेऱ्या चालनात आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**मौजे भाईंदर पाडा (जि.ठाणे) येथील ११५ एकर जमिनीच्या ७/१२ उताऱ्यामध्ये बेकायदा फेरफार केल्याबाबत**

**(५१) * ३२७४४ श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोडबंदर रोडच्या मौजे भाईंदर पाडा (जि.ठाणे) येथील (जुना सर्व्हे नं.२०८ पै व नवीन सर्व्हे नं.४) ११५ एकर जमीनीच्या ७/१२ उताऱ्यामध्ये बेकायदा फेरफार करुन शासनाच्या मालकीची असलेली गायरान जमीन द्वारकादास रतनशी या व्यक्तीने स्वत:च्या नावे करुन त्या जमीनीचे वेगवेगळ्या तुकड्यामध्ये विभागनी करुन विकल्यामुळे सद्य:स्थितीत या जमीनीचे ४९ मालक ७/१२ उताऱ्यावर दर्शविण्यात आल्याचे प्रकरण नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाच्या मालकीची असलेली ११५ एकर गायरान जमीन ७/१२ उताऱ्यात बेकायदेशीर फेरफार करुन बळकवणाऱ्या व त्यावर गृहसंकुल उभारणाऱ्या तसेच या सर्व प्रकरणात द्वारकादास रतनशी याला नियमबाह्य मदत करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) मौजे भाईंदर पाडा (जुने गाव ओवळा) येथील जमीन जुना स.नं. २०८, जुना स.नं. १६२, जुना स.नं.२९७, जुना स.नं.२९८,जुना स.नं.२९९ बाबतचा फेरफार क्र. ५९० दि. ३०.५.१९५६ पाहता सदर मिळकतीची जंगल नोंद कमी करुन खाजगी मालकीची नोंद दाखल केलेली दिसून येत आहे.

सदरचा फेरफार पुनर्विलोकनात घेणेबाबत तहसिलदार ठाणे यांनी उपविभागीय अधिकारी, ठाणे यांचेकडे सादर केलेल्या प्रस्तावाचे अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, ठाणे यांनी फेरफार क्र. ५९० पुनर्विलोकनात घेऊन प्रस्तुत प्रकरणी त्यांचे दिनांक ६.८.२०१५ व १२.०८.२०१५ रोजीच्या आदेशान्वये सदर जमिनीच्या गा.न.नं. ७/१२ सदरी "गुरचरण" अशी नोंद पुर्नस्थापित करण्याचे आदेश पारित केले आहेत.

उपविभागीय अधिकारी ठाणे यांचेकडील वर नमूद आदेशाविरुद्ध अप्पर जिल्हाधिकारी ठाणे यांचे न्यायालयात आरटीएस/अपिल दाखल करण्यात आलेले असून मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी त्यांचेकडील रिट याचिका क्र. ३९७५/२०१५ मधील दि.१८.४.२०१५ रोजी दिलेल्या अंतरिमआदेशांच्या अनुषंगाने अप्पर जिल्हाधिकारी ठाणे यांनी दि. २१.०८.२०१५ रोजी उपविभागीय अधिकारी, ठाणे यांचेकडील दिनांक १२.०८.२०१५ चे आदेशास मा. उच्च न्यायालय यांच्या पुढील सुनावणीपर्यंत स्थगिती दिली आहे.

-----------------

**शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील डोळखांब परिसरातील वीजवाहक तारेला स्पर्श झाल्याने तीन व्यक्तींचा झालेला मृत्यू**

**(५२) * ३०७१० श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील डोळखांब परिसरातील गांडूळवाड परिसरात दिनांक ११ ऑक्टोबर, २०१५ रोजी झालेल्या वादळी पावसाने तुटून पडलेल्या वीजवाहक तारेला स्पर्श झाल्याने तीन व्यक्तींचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर घटनेत मृत्यू झालेल्या मृतांच्या कुटूंबियांना तात्काळ आर्थिक मदत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) सदर अपघाताची चौकशी दिनांक १२.१०.२०१५ रोजी विद्युत निरीक्षक,ठाणे यांच्याकडून करण्यात आली आहे.

(३) दिनांक ११.१०.२०१५ रोजी सकाळी १०.३० ते १०.४५ च्या दरम्यान (१)श्री.नामदेव हेमा गांगड, (२)श्रीमती कानी आंबो धुपारी आणि (३)कु.मनोज किसन धुपारी हे तिघेजण मोहाचीवाडी येथून गांडुळवाड या आदिवासी पाडयावर पायवाटेने जात असतांना वादळी पावसामुळे डोळखांब २२ केव्ही उच्चदाब वाहिनीचा बी फेज वायर तुटून खाली पडून विद्युत भारीत राहिली सदर तारेच्या संपर्कात आल्याने वीजेचा धक्का लागून प्राणांतिक अपघात घडला.

मृतांच्या कुटूंबियांना तात्काळ आर्थिक मदत म्हणून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. उपविभाग शहापूर यांच्याकडून तिनही अपघातग्रस्तांच्या वारसास प्रत्येकी २०,०००/-(वीस हजार मात्र) दिनांक ११.१०.२०१५ रोजी देण्यात आलेले आहेत. महावितरण कंपनीच्या नियमाप्रमाणे उर्वरित नुकसान भरपाईची रक्कम मयताच्या वारसांनी कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर देण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कळवा (जि.ठाणे) येथील रेल्वे स्थानकालगतची सुमारे ७५ एकर शासनाची जमीन मफतलाल मॅन्युफॅक्चरिंग कंपनीने बँकाकडे गहाण ठेवल्याबाबत**

**(५३) * २९९४३ श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कळवा रेल्वे स्टेशन जवळील ७५ एकर जमीन शासनाने सन १९५२ मध्ये औद्योगिक वापरासाठी मफतलाल मॅन्युफॅक्चरिंग समूहाला दिली होती सदरची जमीन शासनाची पूर्व परवानगी न घेता, बँकाकडे गहाण ठेवल्याचे दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची जमीन शासनाकडे जमा करण्यात यावी असे आदेश शासनाने माहे ऑगस्ट च्या दुसऱ्या आठवडयात काढण्यात आले असूनही सदरची जमीन मफतलाल उद्योग समूहाने शासनाकडे परत केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ च्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व चौकशी अंती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

मौजे-कळवा, ता.जि.ठाणे येथील ३०३०६० चौ.मी. जमीन सन १९५२ मध्ये मफतलाल मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लि. यांना औद्योगिक वापरासाठी संपादित करुन देण्यात आली होती. सदर जमीन शासनाची पूर्व परवानगी न घेता बँकांकडे गहाण ठेवल्याचे तलाठी- कळवा यांनी त्यांच्या दि.१३.७.२०१५ रोजीच्या पत्रान्वये तहसिलदार, ठाणे यांना कळविले आहे.

(२) तहसिलदार,ठाणे यांनी त्यांच्या दि.१४.७.२०१५ रोजीच्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी, ठाणे विभाग, ठाणे यांना अहवाल सादर केला आहे. त्यानुसार उपविभागीय अधिकारी, ठाणे विभाग, ठाणे यांनी त्यांच्या दि.२१.८.२०१५ रोजी मफतलाल मॅन्युफॅक्चरिंग कंपनीचे नावे असलेली जमीन शासनजमा करण्याचे आदेश पारित केले होते. तथापि, याप्रकरणी मा. उच्च न्यायालयाने त्यांच्या दि.१६.१०.२०१५ रोजीच्या आदेशान्वये उपविभागीय अधिकारी, ठाणे यांच्या आदेशास स्थगिती देऊन

प्रश्नाधीन जमिनीच्या अधिकार अभिलेखामध्ये कंपनीचे नाव दाखल करणेबाबतचे आदेश दिले आहेत. त्यानुसार कार्यवाही करणेबाबत तहसिलदार, ठाणे यांना उपविभागीय अधिकारी, ठाणे विभाग, ठाणे यांनी कळविले आहे.

(३), (४), व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वनहक्क कायदयानुसार गडचिरोली जिल्हयात ३० हजारावर अधिक नागरिकांना वनपट्टे वितरित करण्यात आल्याबाबत**

**(५४) * ३५६९९ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) २००८ च्या वनहक्क कायदयानुसार गडचिरोली जिल्हयात ३० हजारावर अधिक नागरिकांना पट्टे वितरित करण्यात आले, पट्टे मिळालेल्या धारकाचे नाव महसूली रेकॉर्डवर चढवून त्यांना सातबारा देणे आवश्यक असतांना जिल्हयातील महसूल प्रशासनाची यंत्रणा सातबारा न देता बँक कर्जासाठी प्रमाणपत्र लिहून देत आहे, त्यामुळे अनेक बँका शेतकऱ्यांना कर्ज वितरण करत नसल्याची बाब माहे ऑगस्ट २०१५ वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८ मधील तरतूदीनुसार गडचिरोली जिल्हयात आतापर्यंत एकूण ३०५४१ वनपट्टे वाटप करण्यात आलेले आहेत. त्याअनुषंगाने सदर वनपट्टेधारकांना गा. न. नं. ७/१२ उतारे उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने गडचिरोली जिल्हयात माहे ऑक्टोबर २०१५ अखेरपर्यंत ३०३०७ वनपट्टे धारकांच्या जमिनीची मोजणी झालेली आहे व माहे ऑक्टोबर २०१५ अखेर पर्यंत २७६१८ प्रकरणात गा. न. नं. ७/१२ मध्ये नोंदी घेऊन वनपट्टेधारकांना तहसिल कार्यालयाकडून गा. न. नं. ७/१२ उतारे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. ज्यांना गा. न. नं. ७/१२ उतारे अद्याप देण्यात आले नाही अशा वनपट्टेधारकांना वनपट्टयाच्या आधारे कृषी कर्ज तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यास जिल्हाधिकारी यांनी संबंधीत विभागांना व बॅकांना सुचना दिलेल्या आहेत.

जिल्हा प्रशासनाने वरील प्रमाणे कार्यवाही केलेली असल्याने बँकाकडून वनपट्टेधारकांना कर्ज वितरणाबाबत अडचणी आल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(४)प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपूरच्या गांधीबाग, महाल,सिव्हिल लाईन या तीन विभागात वीज वितरण करण्याची जबाबदारी महावितरणने एसएनडीएल कंपनीकडे दिल्याबाबत**

**(५५) * ३२०६१ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूरच्या गांधीबाग, महाल, सिव्हिल लाईन या तीन विभागात वीज वितरण करण्याची जबाबदारी एसएनडीएल या फ्रेंचायझीकडे दिली असल्याचे दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नंदनवन या ठिकाणी उभारण्यात आलेल्या निर्मलनगरी टाऊनशिप मध्ये विकासकाने ९०० हून अधिक फ्लॅटधारक तसेच १५० हून अधिक व्यवसायिक प्रतिष्ठानांना बेकायदेशीर जोडण्यात येऊन व स्वत:ची विज बिले पाठवून ग्राहकांकडून पैस वसूल करुन कोट्यावधी रुपयांची वीज चोरी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती संबंधित दोषी असणाऱ्या व्यक्तींविरुध्द काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नागपूरच्या गांधीबाग, महाल, सिव्हील लाईन या तीन विभागात वीज वितरण करण्यासाठी महावितरणने एसएनडीएल कंपनीची फ्रेचायझी म्हणून नियुक्ती केली आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) विद्युत अधिनियम २००३ तसेच महावितरणच्या प्रचलित कार्यपध्दती व नियमानुसार महावितरण कंपनीकडून पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अवकाली पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याबाबत**

**(५६) * २९९६५ श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात माहे फेब्रुवारी व मार्च २०१५ मध्ये पडलेल्या अवकाळी पावसामुळे ४३ हजार ६१३ शेतकरी बाधीत झाले आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाधीत शेतकऱ्यापैंकी फक्त २ हजार १७३ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित ४१ हजार ३४० नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) रायगड जिल्हयात माहे फेब्रुवारी व मार्च, २०१५ मध्ये पडलेल्या अवकाळी पावसामुळे ४३६१३ शेतकरी बाधित झाले आहेत. त्यापैकी १७३८८ शेतक-यांना नुकसानीबद्दल मदत वाटप करण्यात आली असून, उर्वरित नुकसानग्रस्त शेतक-यांना मदत वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सिंधी बांधवांसाठी केंद्र शासनाने उल्हासनगरात (जि.ठाणे) दिलेल्या जमिनीबाबत**

**(५७) * २८८१२ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंदुस्थान - पाकिस्तान अशी फाळणी झाल्यावर ६६ वर्षापूर्वी निर्वासित म्हणून पाकिस्तान प्रांतातून आलेल्या सुमारे १ लाख सिंधी बांधवांसाठी केंद्र शासनाने उल्हासनगरात (जि.ठाणे) लष्करातील सैन्यासाठी बांधण्यात आलेल्या ब्लॉक, ब्यारेकसमध्ये दिलेला आश्रय व तत्पूर्वी उल्हासनगरात स्वतः घरे मिळतात यासाठी १० हजार इतर धर्मीय नागरिकांच्या वसाहतीतील बैठी घरे पाडून विकासकाने बांधलेल्या बहुमजली इमारतींच्या जमिनीचा ताबा बिल्डर वा जमीन मालकांकडे

राहिल्याने ७५ टक्के प्लॉट धारक मालकी हक्कापासून वंचित राहून त्यांच्या सोसायटयांच्या नोंदी नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उल्हासनगर शहरातील ५० हजारांच्या वर असलेल्या इमारतीत राहणाऱ्या प्लॉट धारकांकडे जागेचा मालकी हक्क व सोसायटयांची नोंद नसल्याने गेल्या ३५ वर्षात शासनाचा सुमारे ५०० ते ७०० कोटी रुपयांचा महसूलही बुडालेला आहे हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास,चौकशीच्या अनुषंगाने संबधित व्यवसायीकांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) सनद धारकाने त्यांच्या मिळकतीचे वा इमारतीचे बांधकाम करणे किंवा विकासकामार्फत विकास केल्यावर सदर इमारतीमधील फ्लॅट धारकांची सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करुन संस्थेची नोंदणी करणे किंवा इमारतीखालील जमीन सहकारी गृहनिर्माण संस्थेस हस्तांतरीत करणेसाठी संस्थेने अर्ज करणे या बाबी मालक, विकासक, सदनिकाधारक यांच्यातील ऐच्छिक बाबी आहेत. तसेच, उल्हासनगरातील इमारतींची निर्वासितांच्या इमारती व इतर धर्मियांच्या इमारती अशी विगतवारी करणे शक्य नसल्याने इतर धर्मिय नागरीकांमधील ७५ टक्के प्लॉटधारक मालकी हक्कापासून वंचित राहून त्यांच्या सोसायटींच्या नोंदी झालेल्या नाहीत, असे निश्चित सांगता येणार नाही.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात झालेला गैरव्यवहार**

**(५८) * ३२३६२ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात सन २००४ ते सन २०१४ या कालावधीत ७ कोटी ७६ लाख रुपयाचे गैरव्यवहार झाल्याची बाब लेखा परिक्षणातून निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य राष्ट्रीय मानव हक्क मंचच्या अध्यक्षांनी दिनांक २७ ऑगस्ट २०१५ रोजी वा त्यासुमारास राज्याच्या मुख्य सचिवांकडे निवेदन देऊन संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाबीची चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) नाही.
(२) होय
दि.१०.८.२०१५ रोजी परिवहन आयुक्त यांना निवेदन दिले आहे.
(३) सदर प्रकरणी गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले नसल्याने चौकशी करण्यात आली नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या औरंगाबाद विभागामध्ये**
**बनावट नावाने नोकरी मिळविल्याबाबत**

**(५९) * ३०५९६ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य परिवहन महामंडळाच्या औरंगाबाद विभागामध्ये सन १९९६ ते २००५ या कालावधीत अनुकंपा तत्वावर करण्यात आलेल्या उमेदवारांच्या भरतीमध्ये मृत कर्मचाऱ्यांशी कोणत्याही प्रकारचा नातेसंबंध नसतानाही काही जणांची बनावट नावाने नोकरी मिळविल्याची प्रकरणे निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) राज्य परिवहन महामंडळाच्या औरंगाबाद विभागामध्ये सन १९९६ ते २००५ या कालावधीत अनुकंपा तत्वावर करण्यात आलेल्या उमेदवारांच्या भरतीमध्ये मृत कर्मचाऱ्याशी कोणत्याही प्रकारचा नाते संबंध नसतानाही काही जणांची बनावट नावाने नोकरी मिळविल्याची प्रकरणे निदर्शनास आली, सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर केलेल्या चौकशीत एकूण ८ उमेदवारांस निलंबित करण्यात येवून त्यांचेवर पुढील प्रमादीय कारवाई राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर सुरु आहे.

तसेच सदर अनुकंपा प्रकरणात जबाबदार असलेल्यांपैकी नऊ कर्मचारी सेवानिवृत्त झाले असून दोन कर्मचाऱ्यांचे निधन झाले आहे. तर उर्वरित चार अधिकारी व एक कर्मचारी यांचेविरुध्द राज्य परिवहन महामंडळाच्या नियमाप्रमाणे त्यांच्या स्तरावर कारवाई सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद जिल्ह्यात रिक्षाचे लायसन्स, बॅच नसतानाही प्रादेशिक परिवहन कार्यालयाने बनावट परवाने वाटप केल्याबाबत**

**(६०) * ३३१८२ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यात रिक्षाचे लायसन्स, बॅच नसतानाही प्रादेशिक परिवहन कार्यालयाने जिल्ह्यात ४ हजार बनावट परवाने वाटण्यात आल्याची घटना दिनांक २० ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३५ हजार रुपयांमध्ये एक परवाना विकण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बनावट परवाना देणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिवाकर रावते :** (१) औरंगाबाद जिल्ह्यात ४ हजार बनावट पारवाने देण्यात आले हे खरे नाही.

तथापि, दिनांक २०.०८.२०१५ रोजी वा त्यासुमारास औरंगाबाद जिल्ह्यात रिक्षाचे लायसन्स व बॅज नसतानाही प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद यांचेकडून एका प्रकरणात ऑटोरिक्षा परवाना जारी झाला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) सदर प्रकरणी क्रांती चौक पोलीस ठाणे, औरंगाबाद येथे भा.दं.वि.चे कलम ४२०, ४६८, ४७१, ३४ नुसार गु.र.नं. ६६६/२०१५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पोलीस चौकशी सुरु आहे. त्याचप्रमाणे सदरहू प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन स्वतंत्रपणे चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड शहरातील चिखलवाडी ते हिंगोलीगेट मार्गावरील वीजेची तार तुटून एक महिलेचा झालेला मृत्यू

**(६१) * ३३९६७ श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.प्रतापराव चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरातील चिखलवाडी ते हिंगोलीगेट मार्गावरुन ११ के.व्ही. हायवोल्टेज वीज वाहिनीची तार गेली असून ही तार तुटून माहे ऑगस्ट, २०१५ च्या सुमारास एका महिलेचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची वीजवाहिनी धोकादायक बनली असून यामुळे गेल्या वर्षभरात दोन ते तीन जणांचे मृत्यू ही झाले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या धोकादायक वीज वाहिनीबाबत संबंधित नागरिकांनी वारंवार महावितरणाकडे तक्रार करुनही अदयापर्यत कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना कोणती तातडीची मदत दिली वा देण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही. महावितरण कंपनीकडून वीज वाहिनीची वेळोवेळी देखभाल व दुरुस्ती करण्यात आली आहे.

(४) विद्युत निरीक्षक,हिंगोली यांनी याबाबत चौकशी केली आहे. तातडीची मदत म्हणून मृतकांच्या नातेवाईकांना महावितरण कंपनीकडून रु. १०,०००/- मदत देण्यात आली आहे. तसेच महावितरणच्या नियमाप्रमाणे उर्वरित नुकसान भरपाईची रक्कम रु. १,९०,०००/- चा धनादेश क्र. २८६८४१ दिनांक २१.११.२०१५ नुसार काढण्यात आला असून मयताच्या वारसांनी कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर सदर धनादेश कंपनीकडून प्रदान करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**येसगी पुले ते शिरुर ताजबंद बी.ओ.टी. तत्वावरील प्रकल्पाचे गौण खनिज शुल्क कल्याण टोल इन्फ्रा प्रा.लि.कंपनीने भरले नसल्याबाबत**

**(६२) * ३७८७६ डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग २२५ येसगी पुले ते शिरुर ताजबंद बी.ओ.टी. तत्वावरील प्रकल्पाचे डी.पी.आर प्रमाणे काम करीत असताना लागणाऱ्या परिमाणा इतके गौण खनिज शुल्क कल्याण टोल इन्फ्रा या प्रा.लि.कंपनीने भरले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कंपनीने पर्यावरण विभागाचीही परवानगी न घेता कामजळगा, ता.मुखेड, नर्सी, ता.नायगांव या ठिकाणी गिट्टीच्या २०० ते ३०० फुट खदाणी खोदल्या व असंख्य ठिकाणी मुरुमासाठी खाजगी जमिनीमध्ये खदाणी खोदल्या याचे मोजमाप घेण्यात आले आहे काय,

(३) असल्यास, या कंपनीने शासनाच्या गौण खनिजाचे नियमबाह्य उत्खनन करुन गौण खनिजाचे शुल्क न भरल्यामुळे खोदकाम केलेल्याना दंड आकारण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी असणाऱ्या कंपनींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे तसेच यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) "नरसी रस्त्याचे चौपदरीकरण करणे", "नरसी -देगलूर रस्त्याचे दुपदरीकरणास्तव सुधारणा करणे", "शिरुर- ताजबंद- मुखेड- नरसी रस्त्याचे दुपदरीकरण करणे" व "नरसी- बिलोली ते राज्यसीमा पेव्हर शोल्डरसह दुपदरीकरण करणे (रामा-२२५)" या कामासाठी गौण खनिजाच्या स्वामित्वधनापोटी एकूण रू.

१४,००,४२,७८७/- इतकी रक्कम आकारण्यात आली असून, त्यापैकी कल्याण टोल इन्फ्रा प्रा. लि. ने रु. ७,८८,१४,१००/- इतकी रक्कम भरली असून, रु. ६,१२,२८,६८७/- एवढी रक्कम शिल्लक आहे.

(२) मौजे कामळजगा, ता. मुखेड येथे दगड उत्खननासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडून देण्यात आलेल्या परवानगीनुसार कल्याण टोल इन्फ्रा प्रा. लि. या कंपनीने दगड उत्खनन केले आहे.  कामजळगा, ता. मुखेड व नर्सी, ता. नायगांव या ठिकाणी गिट्टीच्या २०० ते ३०० फुट खदाणी खोदल्याचे निदर्शनास आलेले नाही.

मौजे मरवाळी, ता. नायगाव व मौजे सावळी थडी, ता. बिलोली येथे सदर कंपनीने मुरूमाचे अवैध उत्खनन केल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) व (४) मौजे मरवाळी, ता. नायगाव येथे मुरूमाचे अवैध उत्खनन केल्याबाबत कल्याण टोल इन्फ्रा प्रा. लि. या कंपनीला रू.३,५१,११,८००/- एवढा दंड आकारण्यात आला असून त्याविरूध्द सदर कंपनीने जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे अपील दाखल केले आहे. सदर अपीलावरील सुनावणीची प्रक्रिया सुरू आहे.

मौजे सावळी थडी, ता. बिलोली येथे मुरूमाचे अवैध उत्खनन केल्याबाबत सदर कंपनीवर रू. २८,८०,०००/- एवढा दंड आकारण्यात आला असून, दंडाच्या वसूलीबाबत संबंधित कंपनीस नोटीस बजावण्यात आली आहे.

तसेच प्रश्न भाग १ मध्ये नमूद स्वामित्वधनाच्या रकमेबाबत संबंधित कंपनीने अपर आयुक्त औरंगाबाद यांच्याकडे अपील दाखल केले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भामा आसखेड धरण (जि. पुणे) प्रकल्प पूर्ण होऊनही प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे अद्‌याप पुनर्वसन न झाल्याबाबत**

**(६३) * २८६९८ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामा आसखेड धरण (जि. पुणे) प्रकल्प पूर्ण होऊनही धरण प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे अद्‌याप पुनर्वसन करण्यात आलेले नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरण प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे दिनांक २१ ऑक्टोबर २०१५ रोजी वा त्यासुमारास बैठक झाली हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बैठकीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

प्रकल्पगंस्तांच्या पुनर्वसनासाठी गावठाणे तयार करण्यात आली असून भूखंड वाटप प्रगतीपथावर आहे. तसेच पर्यायी जमीन मिळण्यासाठी कब्जेहक्काची ६५% रक्कम भरलेल्या पात्र १११ प्रकल्पगंस्तापैकी १०४ प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन वाटप केली असून ६ प्रकल्पग्रस्त निर्वाह क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्र धारण करणारे आहेत व १ प्रकरण छाननीवर आहे.

(२) व (३) दिनांक २१.१०.२०१५ रोजी पुणे महानगरपालीका जलवाहीनीच्या कामातील अडथळे दूर करण्याच्या अनुषंगाने घेण्यात आली होती व त्या बैठकीत पुनर्वसनाबाबतचाही मुद्दा चर्चिला गेला होता. बैठकीत उपस्थित मुद्यांवर नियमानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले होते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भांडुप, मुंबई येथील मे.वेस्टन मॅकेनिकल इंडस्ट्रिज प्रा.लि.**
**कंपनीसह तेरा कंपन्या बंद असल्याबाबत**

**(६४) * ३१०५९ श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडुप (प), मुंबई येथील औद्योगिक क्षेत्राकरिता संपादीत केलेल्या जमिनीवरील मे.वेस्टन मॅकेनिकल इंडस्ट्रिज प्रा.लि. कंपनीसह तेरा कंपन्या बंद आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपन्यांसाठी शासनाने ज्या मालकांच्या जमिनी संपादीत केलेल्या आहेत, त्या मुळ मालकांना परत कराव्यात किंवा त्याचा योग्य मोबदला देण्यात यावा, अशी मागणी स्थानिक आमदारांनी दिनांक १५ जानेवारी, २०१५ रोजी मा.महसूल मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने मा.महसूल मंत्री यांनी दिलेल्या निदेशानुसार मा.राज्यमंत्री महसूल यांनी दिनांक १६ मार्च, २०१५ रोजी घेतलेल्या बैठकीमध्ये कंपन्यासाठी संपादीत केलेल्या जमिनी सदर कंपन्याना त्या जमिनीचा विकास विक्री करण्यास व जमिनी वापराचे प्रयोजन बदलण्यास परवानगी देऊ नये व सदर जमिनी ज्या मूळ मालकांच्या संपादीत करण्यात आल्या आहेत, त्या भूधारकांना जमिनीचा मोबदला दिला आहे की नाही याची खात्री करण्याबाबत जिल्हा अधिकारी मुंबई उपनगर, बिल्डींग प्रपोजल विभाग, अधिकारी बृहन्मुंबई महानगरपालिका यांना सदर बैठकीत निदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर व बिल्डींग प्रपोजल विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी आतापर्यंत केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे व सदरची कार्यवाही किती दिवसात पूर्ण होणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.

भांडूप येथील औद्योगिक क्षेत्राकरीता संपादित केलेल्या जमिनीवर मे. वेस्टर्न मेकॅनिकल इंडस्ट्रीज प्रा.लि. या कंपनीसह ९ कंपन्या असून त्यापैकी ४ कंपन्या बंद आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे अंशत: खरे आहे.

संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला भूधारकांना दिला किंवा नाही याबाबत खात्री झाल्याशिवाय, संबंधीत कंपन्यांना त्या जमिनींचा विकास करण्यास, विक्री करण्यास तसेच जमीन वापराचे प्रयोजन बदलण्यास परवानगी देऊ नये, असे निदेश मा.राज्यमंत्री महसूल यांनी दिनांक १६ मार्च, २०१५ रोजीच्या बैठकीमध्ये दिले आहेत.

(४) राज्यमंत्री (महसूल) यांनी दिनांक १६.३.२०१५ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेल्या निदेशानुसार खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(अ) मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट याचिका क्र. ६५८१/१९७६ व ६६६/१९७६ आणि रजिस्ट्रार ऑफ कंपनीज यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र या आधारे मे. वेस्टर्न मेकॅनिकल इंडस्ट्रीज प्रा.लि कंपनीचे नाव मिळकतपत्रामधून कमी करुन मे. डब्ल्यु.एम.आय.क्रेन्स प्रा. लि. या कंपनीचे नाव दाखल करण्यात आले आहे.

(ब) मे. डब्ल्यु.एम.आय. रियल इस्टेट डेव्हलपर्स यांनी जमिनीचा विकास व वापरात बदल करण्यासाठी दिनांक २८.१०.२०१४ रोजी अर्ज केला होता. तथापि कंपनीस त्याबाबतची परवानगी देण्यात आलेली नाही.

(क) सिएट टायर्स कंपनीसाठीच्या संपादनाच्या ११ प्रकरणांमध्ये मोबदला वाटप करण्यात आलेला असून १० प्रकरणांमध्ये भूसंपादन अधिनियम, १८९४ चे कलम ३० खाली मा. उच्च न्यायालयात भूसंदर्भ दाखल करण्यात आलेला आहे.

(ड) इतर कंपन्यांसाठीच्या भूसंपादन प्रकरणांमध्ये संपादित जमिनींबाबतचे मुळ अभिलेख शोधण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालयाकडून सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**मुळशी (जि.पुणे) तालुक्यात लवासा कॉर्पोरेशनतर्फे लेक सिटी प्रकल्प उभारण्यासाठी आदिवासींच्या जमिनी घेतल्याबाबत**

**(६५) * ३०५५५ ॲड.के.सी. पाडवी (अक्कलकुवा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील लवासा कॉर्पोरेशनकडे हस्तांतरित करण्यात आलेली आदिवासींची १९१ एकर जमीन त्यांना परत करण्याचे आदेश उपविभागीय अधिकारी यांनी दिल्याचे दिनांक ७ ऑक्टोबर, २०१५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुळशी तालुक्यात लवासातर्फे लेक सिटी प्रकल्प उभारला जात आहे त्यासाठी आदिवासींची जमीन घेण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती लवासा कॉर्पोरेशला मदत करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, लवासा कॉर्पोरेशनकडून आदिवासींची घेतलेली १९१ एकर जमीन परत मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२), (३) व (४) प्रश्नाधीन प्रकल्पासाठी काही आदिवासींच्या जमीनी लवासा कॉर्पोरेशन लि. यांनी संबंधित आदिवासींकडून खाजगी वाटाघाटीने खरेदी केल्या आहेत. संबंधित आदिवासी खातेदारांच्या जमिनीच्या गा.न.नं.७/१२ मध्ये "महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ३६ व ३६ अ च्या तरतूदीस पात्र" असे शेरे दाखल नसल्याने सदर जमिनीचे विक्री व्यवहार होवून त्यासंबंधी नोंदी अधिकार अभिलेखात झाल्याचे दिसून येते. मात्र कोणत्याही अधिका-यांनी लवासा कॉर्पोरेशन लिमिटेड यांना मदत केल्याचे निदर्शनास आले नाही.

(५) प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ३६ व महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिन प्रत्यार्पित करण्याचा अधिनियम, १९७४ व नियम, १९७१ प्रमाणे चौकशी पूर्ण करुन उपविभागीय अधिकारी, मावळ-मुळशी यांच्याकडून आदेश पारीत करण्यात आलेले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

## माझगांव येथील भूखंड हस्तांतरणास जिल्हाधिकारी कार्यालयाने दिलेल्या मान्यतेबाबत

**(६६) * ३०७१४ श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माझगांव (मुंबई) येथील भूखंड क्र. १२६ (भाग) हा भूखंड सन १९०३ मध्ये ९९ वर्षाच्या भाडेपट्यावर कच्छी लोहाणा निवास गृह ट्रस्टला देण्यात आलेला भाडेकरार सन २००२ मध्ये संपुष्टात आल्यानंतर या भूखंडाचा भाडेपट्टा वाढवून मिळावा या ट्रस्टच्या मागणीचे प्रकरण जिल्हाधिकारी, मुंबई यांच्याकडे प्रलंबित असताना धर्मादाय आयुक्तांच्या परवानगीने सन २००५ मध्ये हा भूखंड एका खाजगी विकासकाला हस्तांतरीत करण्यात आल्याचे दिनांक १ सप्टेंबर,२०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूखंड हस्तांतरणासाठी महसूल विभागाची परवानगी व तत्कालीन शहर जिल्हाधिका-यांची मान्यता घेण्यात आली होती काय,

(३) असल्यास, शासनाच्या मालकीच्या भूखंडाचे मानीव अभिहस्तांतरण करण्याची उपनिबंधकांची कृती गंभीर असल्यामुळे तत्कालीन महसूल मंत्र्यांनी चौकशी करण्याचे आदेशही दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर चौकशीच्या अनुषंगाने नियमबाह्य भूखंडाच्या हस्तांतरणास मान्यता देणाऱ्या उपनिबंधकाविरुध्द तसेच याप्रकरणी दोषी आढळलेल्या इतर अधिकाऱ्यांविरुध्द काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) नाही.

(३) होय.

(४) प्राप्त अहवालानुसार, जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी संबंधित उप निबंधक यांच्या आदेशाच्या अनुषंगाने चौकशी करण्याबाबत आयुक्त सहकार यांना कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्य परिवहन महामंडळाच्या पुणे केंद्रातून गायब**
**झालेल्या तिकिटांच्या अहवालाबाबत**

**(६७) * २८४३० श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या पुणे केंद्रातून गहाळ झालेल्या २६ लाख तिकिटांच्या चौकशीसाठी शासनाने माहे जुलै २०१५ मध्ये वा त्यादरम्यान चौकशी समितीची नियुक्ती केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तिकीट गैरव्यवहाराच्या चौकशीबाबतचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती संबंधितांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) राज्य परिवहन महामंडळाच्या पुणे केंद्रातून रु.१६,४७,४३२/- रकमेची तिकिटे गहाळ असल्याचा अहवाल सुरक्षा खात्याने सादर केला होता. याबाबत सखोल चौकशी करण्याकरिता विभागातील अधिकाऱ्यांचा तपासणी गट तयार करुन त्याद्वारे दिनांक २१.०५.२०१५ ते दिनांक २६.०५.२०१५ या दरम्यान तपासणी मोहिम राबविण्यात आली होती.

तपासणी अहवालानुसार पुणे केंद्रातून रु. ६,२४,५२९/- रकमेची तिकिटे गहाळ असल्याचे आढळून आले आहे. सदर गहाळ झालेल्या तिकिटांच्या एकूण रु. ६,२४,५२९/- रकमेची वसुली संबंधितांकडून करण्यात आली असून एकूण जबाबदार २३ कर्मचारी व ४ अधिकाऱ्यांवर खातेनिहाय प्रमादीय कारवाई राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**कुसुंबी (ता.जिवती, जि.चंद्रपूर,) येथील आदिवासी व कोलामांच्या जमिनी**
**माणिकगड सिमेंट कंपनीने नियमबाह्यरित्या घेतल्याबाबत**

**(६८) * ३२४७६ श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुसुंबी (ता.जिवती, जि.चंद्रपूर) येथील आदिवासी व कोलामांच्या जमिनी माणिकगड सिमेंट कंपनीने नियमबाह्यरित्या सन १९८४-८५ मध्ये घेतल्या व सदर जमिनींचा फेरफार तब्बल २७ वर्षानंतर केला असून या जमिनी अकृषक न करता

कंपनी कडून अनेक वर्षापासून उत्खनन करण्यात येत असल्याचे माहे सप्टेंबर २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने दोषींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) तसेच कुसुंबी येथील ज्या आदिवासी व कोलामांच्या जमिनी माणिकगड कंपनीने अधिग्रहित केल्या आहेत त्यांचे पुनर्वसन व मोबदला देण्याबाबत काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) मौजे नोकारी, कुसुंबी आणि वनविभागाच्या खंड मधील एकूण ६४३.६२हे.आर क्षेत्रावर चुनखडक या खनिजासाठी २० वर्ष कालावधीसाठी मे. माणिकगड सिमेंट कंपनीला उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे आदेश दिनांक ३०.४.१९७९ अन्वये खाणपट्टा मंजूर करण्यात आला आहे. आणि नंतर सदर विभागाच्या दि.१५.११.२००२ च्या आदेशान्वये सदर खाणपट्याचे पुढील २०वर्षासाठी नुतनीकरण करण्यात आले आहे.

उक्त खाण पट्ट्यात समाविष्ट असलेल्या अदिवासींच्या जमिनी ह्या मूळआदिवासींच्याच नावाने असून मंजूर खाण पट्यातील सदर जमिनीच्या गा. न. नं. ७/१२ वर इतर आधिकारामध्ये मे.माणिकगड सिमेंट कंपनीला चुनखडी दगडाच्या उत्खननासाठी भुपृष्ट हक्काचे अधिकार दिल्याची नोंद घेण्यात आली आहे.

सदर खाणपट्ट्यातील शेतजमीनींचा व घरांचा पुनर्वसन मोबदला संबधित शेतक-यांना दिल्यानंतरच उक्त जमिनींचे भूपृष्ठ हक्काचे अधिकार सदर कंपनीस देण्यात आल्याचे दिसून येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर येथील लक्ष्मी विष्णू टेक्सटाईल मिलच्या जागेची बेकायदा विक्री केल्याबाबत

**(६९) * ३६५८२ श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथील लक्ष्मी विष्णू मिलची जागा लीझ होल्ड ची असतानाही तत्कालीन अधिकाऱ्यांनी बिल्डरशी संगनमत करून जमिनीची बेकायदा विक्री करून

शासनाची तसेच मिलच्या कामगारांची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मिलच्या जागेवर बांधकाम असतानाही खुल्या जागेचे मुल्यांकन दाखवून खरेदी दस्त बनविला असून जागेवरील वीज वितरण कंपनीचा बोजा कायम ठेऊन विक्रीकर बोजा कमी करुन सदर व्यवहार कोर्ट रिसिव्हर व लीक्विडेटर यांना कोणतीही कल्पना न देता केला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर विक्री झालेला व्यवहार रद्द करण्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत असून उक्त प्रकरणी दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) सोलापूर येथील मे.लक्ष्मी विष्णू टेक्सटाईल मिलच्या जागेचा विक्री व्यवहार "कर्ज वसूली न्यायाधिकरण, मुंबई" यांचे मार्फत व देखरेखीखाली करण्यात आला असून विक्री करण्यात आलेल्या जमिनीपैकी नगर रचना योजना क्र.४, सोलापूर येथील अंतिम भूखंड क्र.१६५ क्षेत्र ४६१७४.०० चौ.मी. इतकी जमीन आखीव मिळकत पत्रिका पाहता "लिज होल्ड" अधिकाराची असल्याचे दिसते.

(२), (३), (४) व (५) मे.लक्ष्मी विष्णू टेक्सटाईल मिलच्या जमिनीचा विक्री व्यवहार "कर्ज वसूली न्यायाधिकरणाच्या" पर्यवेक्षणाखाली करण्यात आलेला असून कर्ज वसूली न्यायाधिकरणाची (D.R.T.) स्थापना व त्याचे संनियंत्रण केंद्र शासनाच्या अखत्यारीत असल्याने याबाबत या विभागाचे कोणतेही अभिप्राय नाहीत व उक्त प्रकरणी राज्य शासनाने चौकशी करण्याचा व तदनुषंगाने कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेस मध्ये तिकीट विक्रीसाठी वापरल्या जाणा-या इलेक्ट्रॉनिक यंत्राच्या कराराबाबत

**(७०) * २८८४४ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर**

**दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या मुख्य सुरक्षा व दक्षता विभागाने ट्रायमॅक्स या कंपनी बरोबर इलेक्ट्रॉनिक तिकिट यंत्राच्या केलेल्या करारामुळे एसटीला कोट्यावधी रुपयांचे नुकसान होत असल्याबाबतचे लेखी पत्र मा.परिवहन मंत्री तसेच एसटी महामंडळाचे अध्यक्ष व एसटी व्यवस्थापकीय संचालक यांना पाठविल्याची बाब दिनांक २ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मशीनद्वारे झालेल्या तिकीट विक्रीच्या प्रक्रियेमुळे एस.टी. प्रशासनाला नुकसान झाले असतानाही, एस.टी. अधिकाऱ्यांच्या संगनमताने सोयीस्कर अटी घालून ट्रायमॅक्स कंपनीची मुदत संपलेली असताना, पुन्हा ट्रायमॅक्स कंपनीला काम देण्यात आल्यामुळे यामध्ये पुन्हा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२), (३) व (४) इलेक्ट्रॉनिक तिकिट यंत्राच्या करारासंदर्भात मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी, राज्य परिवहन महामंडळ यांनी दि.३१ जुलै २०१५ रोजी पत्र दिलेले आहे. इलेक्ट्रॉनिक तिकीट यंत्राच्या संदर्भात ट्रायमॅक्स या कंपनीबरोबर करार करण्यात आलेला असून सदर कार्यरत प्रकल्पाचा करार कालावधी दि.१० डिसेंबर, २०१४ रोजी संपुष्टात येण्याअगोदर महामंडळाने प्रकल्पाची गरज लक्षात घेऊन निविदेतील तरतुदीनुसार प्रकल्पास एक वर्षाची मुदतवाढ दिली व ती दि.१०.१२.२०१५ पर्यंत अस्तित्वात आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खरवडा (ता.पूर्णा, जि.परभणी) येथील वाळू घाटामधून नियमापेक्षा जास्त वाळूचे उत्खनन करुन अवैध रित्या वाहतूक केल्याबाबत

**(७१) * ३३१०५ श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरबडा (ता.पुर्णा, जि.परभणी) येथील वाळू घाटामधून संबंधित कंत्राटदाराने कराराचा भंग करुन नियमापेक्षा जास्त वाळूचे उत्खनन करुन अवैध रित्या वाहतुक

केल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यासुमारास महसुल विभागाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, संबंधित कंत्राटदाराने एकूण किती वाळू नियमबाह्यरित्या उत्खनन केल्याचे निष्पन्न झाले असून चौकशीच्या अनुषंगाने कंत्राटदारावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) मौजे खरबडा, ता. पूर्णा जिल्हा परभणी येथील वाळूगटातून संबंधित लिलावधारकाने केलेल्या रेती उत्खननाची जुन, २०१५ मध्ये मोजणी केली असता, लिलावधारकाने २६२८ ब्रास रेतीचे अवैध उत्खनन व वाहतुक केल्याचे निष्पन्न झाल्याने, लिलावधारकाविरूध्दरूपये १,४०,५९,८००/- एवढया रकमेच्या दंडाचे आदेश दि. १९.९.२०१५ रोजी पारित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूरसह गडचिरोली, अमरावती, यवतमाळ, वर्धा, अकोला जिल्हयात पावसामुळे महापूर येऊन शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याबाबत

**(७२) * २९३२२ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर गडचिरोली, अमरावती, यवतमाळ, वर्धा, अकोला जिल्हयात पाऊसामुळे महापूर येऊन चार जणांचा मृत्यू होऊन शेतीचे व घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे दिनांक ०७ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच कळमेश्वर (जि.नागपूर) तालुक्यात दिनांक १३ ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या अतिवृष्टीने जवळपास ४७०० हेक्टरमधील पीक उध्दवस्त झाले असून २१६ घरांचे नुकसान झाले, तसेच धरणाचे पाणी सोडल्याने वरोडच्या जाम नाल्यास पूर

येऊन अनेकांच्या पोल्ट्रीफार्मच्या शेडमध्ये पाणी घुसून पक्षी व कोंबड्या वाहून गेल्यामुळे त्यांचे अतोनात आर्थिक नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर जिल्ह्यात अनेक नागरिकांना अद्यापपर्यंत नुकसान भरपाईची रक्कम मा.जिल्हाधिकारी नागपूर, जिल्हा कार्यालयाच्या अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे मिळाली नसल्याबाबतची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, महापुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे व मृत्यू पावलेल्या कुटूंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत त्याचप्रमाणे नुकसान भरपाई देण्यास हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय. हे खरे आहे.

(२) कळमेश्वर तालुक्यातील मौजा-सोनापार व मौजा-वरोडा येथील ८००० कोंबड्या मरणपावल्या असून प्रती कोंबडी रु.५०/- प्रमाणे प्रती कुटूंब रु.५०००/- या मर्यादेत दोन कुटुंबाकरिता रु.१००००/- मदत वाटप करण्यात आली आहे.

(३) नागपूर जिल्ह्यात सदर कालावधीत १६ लोकांचा मृत्यू झाला असून मात्र १४ व्यक्तींच्या कुटुंबियांना रु.५६ लक्षची मदत करण्यात आलेली आहे. मृतांपैकी १ व्यक्तीची ओळख पटली नसून १ मृतदेह मिळाला नाही. अंशत: व पूर्णत: घरांच्या नुकसानीकरिता रु.२५,९५,९७,७५०/- चे वाटप करण्यात आलेले आहे.

(४) होय.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### ठाणे जिल्ह्यातील दिवा-कोपर स्थानकादरम्यान तिवरांच्या झाडांची तोड करुन बेसुमार वाळू उपसा होत असल्याबाबत

**(७३) * २९२७७ श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी),**

**श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिवा-कोपर (जि.ठाणे) या रेल्वे स्थानकांदरम्यानच्या खाडीतून मागील काही वर्षात मोठया प्रमाणात वाळू उपसा करण्यात येऊन तेथील असलेल्या तिवरांच्या झाडांचीही मोठया प्रमाणात बेसुमार तोड होत असल्याने तेथील खाडीचे पाणी थेट रेल्वेमार्गा पर्यंत येत असल्याने रेल्वे मार्गाला धोका निर्माण झाला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने वाळू उपसा व झाडाची कत्तल करण्याऱ्यांवर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) तहसिलदार कल्याण यांच्या पथकाने दि.०३.०८.२०१५ रोजी मौजे कोपर खाडीमध्ये वाळूच्या अवैध उपशाबाबत पाहणी केली असता, तेथे सक्शनपंपाचे साहित्य, पाईप व ड्रम आढळून आले. तसेच कोपर खाडीतील रेल्वे ट्रॅकलगत काही ठिकाणी तिवराच्या झाडांचे नुकसान झाल्याचेही दिसून आले. याबाबत अज्ञात व्यक्तीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिवा-कोपर खाडी किनाऱ्यालगतच्या रेल्वेमार्गाला धोका झाला किंवा कसे याबाबतचा तांत्रिक अहवाल रेल्वे प्रशासनाकडून मागविण्यात आला असून, सदर अहवाल अप्राप्त आहे.

तहसिलदार कल्याण यांच्याकडून रेल्वे प्रशासनास ठाकुर्ली व कोपर ते दिवा रेल्वे मार्गालगतच्या धोकादायक ठिकाणी संरक्षक भिंत बांधण्याबाबत व सुरक्षा रक्षक पथकाची नेमणूक करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

खाडीपात्रातील अवैध वाळू उत्खननास आळा घालण्यासाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, रेल्वे प्रशासन व पोलीस विभागास गस्त घालण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच उपविभागीय अधिकारी कल्याण यांच्या सनियंत्रणाखाली गस्ती पथके तयार करण्यात आली असून, त्यांच्यामार्फत तपासणी करण्यात येत आहे.

खाडीकिनारी असलेल्या १४८ जमिन मालकांना त्यांच्या जागेत वाळूचा साठा केला जाणार नाही, याबाबत खबरदारी घेण्यास नोटीस देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**गावशी (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) येथील गायरान जमिनीवरील अतिक्रमणाबाबत**

**(७४) * ३५३५२ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील गावशी (ता.राधानगरी) येथे गायरान जमिनीमध्ये अतिक्रमण करून शेततळे व ऊस शेती ५ एकरामध्ये करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तहसीलदार राधानगरी व जिल्हाधिकारी कोल्हापूर यांना वारंवार तक्रार देऊनही कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अतिक्रमण करणाऱ्या व तक्रारींकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

शेततळी व ऊस शेती यांचे अतिक्रमण क्षेत्र एकूण १६२ आर. आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

गायरान जमिनीवरील अतिक्रमण निष्काशित करण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थेची असल्याने तहसीलदार, राधानगरी यांनी त्यांच्या दि.२६/३/२०१५ च्या पत्रान्वये गायरान जमिनीवरील अतिक्रमण काढण्याबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, राधानगरी यांना कळविण्यात आले होते. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडील दि.३०/५/२०१५ रोजीच्या पत्राने सदरचे अतिक्रमण तात्काळ हटविण्याबाबत तहसीलदार यांना कळविण्यात आले आहे. तसेच गट विकास अधिकारी, पंचायत समिती, राधानगरी यांनी त्यांच्याकडील दि.२०/६/२०१५ च्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडे तत्कालिन ग्रामसेवक श्री.एन.के.कुंभार व सध्याची ग्रामपंचायत कार्यकारीणी यांच्यावर पुढील कार्यवाहीसाठी अहवाल सादर केला आहे.

(३) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, राधानगरी कार्यालयामार्फत चौकशी करण्यात आलेली आहे.

(४) ग्रामपंचायत गवशीकडून दि.१४/१०/ २०१५ च्या मासिक सभेत अतिक्रमणाबाबत पंचनामा करण्यासाठी ठराव करण्यात आला. तसेच दि.२४/११/२०१५ रोजीच्या मासिक सभेमध्ये गायरान मधील अतिक्रमण धारकांना अतिक्रमण काढून घेण्याबाबत ठराव

करण्यात आला. त्यानुसार दि.३०/११/२०१५ रोजी अतिक्रमण धारकांना अतिक्रमण काढण्याबाबत नोटीस बजाविण्यात आली आहे. तत्कालिन ग्रामसेवक श्री.एन.के.कुंभार यांच्यावर विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे माणी (ता.खेड, रत्नागिरी) येथील शेती व बागायतीमध्ये विद्युत खाबांवरील तारा तुटून लाखो रुपयांचे झालेले नुकसान**

**(७५) * ३४६८२ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे माणी (ता.खेड, रत्नागिरी) येथील गट नं. ४३०, ४९८, ६९४ व ५०५ मधील शेती व बागायतीमध्ये दिनांक १ एप्रिल, २०११ रोजी वा त्यासुमारास महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या विद्युत खाबांवरील तारा तुटून शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होवूनही अद्यापही शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तालुका कृषी अधिकारी खेड, जि.रत्नागिरी यांनी फळपिकांचे मुल्यांकन करण्यात येत नसल्याबाबत दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या पत्रान्वये महावितरण कंपनीला कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.उर्जा मंत्री यांनी संचालक, महावितरण यांना नुकसान भरपाई देण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्न भाग (२) व (३) मध्ये दिलेल्या निर्देशानुसार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अशंतः खरे आहे.
(२) हे खरे आहे. फक्त अस्तित्वात असलेल्या जिवंत फळझाडांचे मूल्यांकन करता येते. तसेच कोणत्याही वेळेचा पंचनामा/पंचयादी किवा ७/१२ उताऱ्याच्या आधारे मूल्यांकन करता येत नसल्याचे तालुका कृषी अधिकारी, खेड यांनी त्यांच्या दिनांक २८ ऑगस्ट,२०१५ च्या पत्रान्वये महावितरण कंपनीस कळविले आहे.
(३) नुकसान भरपाई देण्याबाबत महावितरण कंपनीने स्वयंस्पष्ट परिपत्रक वितरीत केले असल्याने वेगळे आदेश काढण्यात आले नाही. नुकसान भरपाई देण्यासंबंधीचे परिपत्रक सर्वाना बंधनकारक आहे.

(४) जिल्हाधिकारी,रत्नागिरी यांच्या निर्देशानुसार उपविभागीय अधिकारी(प्रांत) खेड यांचेकडून सदरील जळीत प्रकरणाच्या नुकसान भरपाईबाबत आवश्यक असणारे मुल्यांकनाबाबत महावितरण कंपनीस आजतागायत अहवाल प्राप्त झाला नसल्यामुळे नुकसान भरपाईची कार्यवाही प्रलंबित आहे. उपविभागीय अधिकारी खेड यांच्याकडून सदर जळीत प्रकरणाबाबतचा मुल्यांकन अहवाल प्राप्त होताच नियमाप्रमाणे त्वरीत कार्यवाही करण्यात येईल.

(५) विभागीय कार्यालय,खेड कडून तहसीलदार खेड व तालुका कृषी अधिकारी यांना वारंवार पत्रव्यवहार करुन झाडांचे मुल्यांकन मिळावे यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. उपविभागीय अधिकारी(प्रांत)स खेड यांचेकडून सदरील जळीत प्रकरणांच्या मुल्यांकनाबाबत अद्याप कोणतेही निर्देश महावितरण कंपनीस प्राप्त झालेले नाहीत.

-----------------

## मौजे अंबवडे (ता.खटाव, जि.सातारा) येथील येरळा नदीत वाळू उपशामुळे झालेल्या खड्यातील पाण्यात बुडून तीन शाळकरी मुलांचा झालेला मृत्यू

**(७६) * ३०५६९ श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अंबवडे (ता.खटाव, जि.सातारा) येथील येरळा नदीत वाळू माफियांनी वाळू उपसा करुन झालेल्या खड्यातील पाण्यात बुडून तीन शाळकरी मुलांचा मृत्यू झाल्याची घटना दि. १७ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार येरळा नदीपात्रात वाळू उपसा करुन खड्डे करणाऱ्या वाळू माफियांवर तसेच संबंधित जबाबदार असलेल्या महसूल अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच सदर प्रकरणात मृत झालेल्या शाळकरी मुलांच्या कुटुंबियांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) सन २०१४-१५ मधील मौजे पिंपरी, ता. खटाव येथील येरळा नदीपात्रातील वाळूगटाच्या लिलावधारकाने केलेल्या वाळू उत्खननामुळे तसेच अंबवडे येथील येरळा नदीपात्रातील अवैध वाळू उत्खननामुळे नदीपात्रातील खड्डे मोठे होऊन, त्यामध्ये दि. १७/१०/२०१५ रोजी ३ शाळकरी मुले

पडून त्यांचा मृत्यू झाला. प्रस्तुत प्रकरणी संबंधित लिलावधारक व त्या ठिकाणी वेळोवेळी अवैध उत्खनन करणाऱ्या इतर २० व्यक्तींविरुध्द दि. १८/१०/२०१५ रोजी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.

(४) मृत झालेल्या शाळकरी मुलांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहाय्यता निधितून अर्थसहाय्य मिळण्याबाबत मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला असून, राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह योजनेतून सहाय्य मिळण्याबाबत शालेय शिक्षण विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वाडा (जि.पालघर) तालुक्यातील कुक्कुटपालनाचा जोड व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांची खाजगी पोल्ट्री कंपन्यांकडून फसवणूक होत असल्याबाबत**

**(७७) * ३५५११ श्री.विलास तरे (बोईसर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील कुक्कुटपालनाचा जोड व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांची सगुणा, व्यकंटेश्वरा, प्रिमियम, आनंद ॲग्रो सारख्या कंपन्या फसवणुक करीत असल्याबाबतचे निवेदन प्रांत अधिकारी, वाडा यांना ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनातील प्रमुख मागण्या कोणत्या आहेत व त्या मागण्यांवर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, पालघर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात शेतीला जोडधंदा म्हणून कुक्कुटपालन व्यवसाय केला जातो यासाठी प्रश्न भाग १ मधील खाजगी कंपन्या शेतकऱ्यांशी व्यावसायिक करारनामा न समजणाऱ्या इंग्रजी भाषेतून केला जातो, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याचप्रमाणे त्या करारपत्रावर अशिक्षित शेतकऱ्यांच्या सह्या घेऊन व विना तारखेचे कोरे धनादेश घेतात, परंतु सदरहु कंपन्या ऋतुमानानुसार खराब पिल्ले व कमी दर्जाचे खाद्य व इतर गोष्टींचा पुरवठा करुन या व्यवसायातील झालेल्या तोट्याला शेतकऱ्यांना जबाबदार धरुन त्यांच्या हक्काचे व मेहनतीचे पैसे कापून घेतात त्यामुळे आधीच कर्जबाजारी असलेला शेतकरी व्यावसायिक तोट्यामुळे आत्महत्येस प्रवृत्त होतात ही बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकारणी शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी असणाऱ्यावंर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर निवेदनामधील शेतकऱ्यांबरोबर होणारे करार हे इंग्रजी बरोबर मराठीतही असावेत व कंपनीने अनधिकृतपणे कुक्कुटपालन व्यवसायिकांकडून कोरे चेक घेणे बंद करावे ह्या प्रमुख मागण्या आहेत.

सदर पोल्ट्री व्यवसाय हा शेतकरी व खाजगी पोल्ट्री कंपन्या यांच्यामध्ये पुर्णत: वैयक्तिक स्वरुपाचा व्यावसायिक करार करून केला जातो. सदर कराराचे पालन न झाल्यास संबंधितांना न्यायालयात दाद मागता येते.
(३) हे खरे नाही.

काही करार मराठी भाषेत व काही करार इंग्रजी भाषेत करण्यात आलेले असुन, हे करार उभयपक्षीय आहेत.
(४) हे खरे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील सीमावर्ती भागातील १४ गावांचे पीक सर्वेक्षण तेलंगणा राज्याने केल्याबाबत

**(७८) * ३१६०९ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र-तेलंगणा सीमेवरील चंद्रपूर जिल्ह्यातील फाजल अली समितीने आंतरराज्य सीमेनुसार निर्धारित केलेल्या १४ गावांमध्ये तेलंगणा सरकारने ऑगस्ट/सप्टेंबर, २०१५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतक-यांचे नुकसान झाल्याप्रकरणी पीक सर्वेक्षण करुन त्यांना सहाय्य केले तसेच तेलंगणा सरकारने सदर शेतक-यांना मालकी हक्काने शेतजमिनी दिलेल्या असल्याचे ऑक्टोबर, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर प्रकरणी या सीमावर्ती भागातील गावांचा विकास करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) नाही. तथापि, अशा आशयाची बातमी दि.०३/१०/२०१५ रोजीच्या दैनिक वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली होती. सदर बातमी चुकीची/दिशाभूल करणारी असल्याने त्यासंदर्भात खुलासा प्रसिद्ध करण्याबाबत जिल्हा माहिती अधिकारी यांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**धोत्रा जहागीर (ता.कारंजा, जि.वाशिम) येथील सिंचन विहीरी अतिवृष्टीमुळे खचून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याबाबत**

**(७९) * ३६१७९ श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धोत्रा जहागीर ( ता.कारंजा, जि.वाशिम ) येथील सन २०१३ मध्ये अतिवृष्टीने तालुक्यातील अनेक सिंचन विहीरी खचून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते सदर विहिरीच्या दुरुस्तीचे अनुदान अद्यापपर्यंत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मिळाले नसल्याने हे अनुदान तातडीने मिळण्याबाबत धोत्रा जहागीर येथील शेतकऱ्यांनी दिनांक ५ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी वाशिम यांच्याकडे निवेदनद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळण्याबाबत जिल्हा प्रशासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महात्मा गांधी नरेगाअंतर्गत वाशिम जिल्ह्यातील कारंजा तालुक्यातील अतिवृष्टीमुळे खचलेल्या व बुजलेल्या व विहिरीच्या दुरुस्तीचे एकूण ५२८ प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यामध्ये धोत्रा जहागीर येथील प्रस्तावाचा समावेश आहे.

(३) शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१४/प्र.क्र.२५/मग्रारो-१, दिनांक २० जुलै, २०१५ अनुसार अतिवृष्टीने खचलेल्या व बुजलेल्या विहिरीची दुरुस्ती करण्याकरिता कमाल रुपये १.५० लक्ष इतकी रक्कम अनुज्ञेय आहे. वाशिम जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीने खचलेल्या विहिरीचे पंचनामे संबंधित तलाठी, कृषि सहायक व तांत्रिक अधिकारी यांनी करण्याबाबत सर्व तहसीलदार यांना दिनांक ७ ऑक्टोबर, २०१५ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, वाशिम यांनी सुचना दिल्या आहेत. यासंदर्भात पुढील आवश्यक कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे येथील फुलेनगरमधील प्रादेशिक परिवहन कार्यालयात**
**रिक्षा प्रमाणीकरणात होत असलेला गेरप्रकार**

**(८०) * ३००९१ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील फुलेनगरमधील प्रादेशिक परिवहन कार्यालयात रिक्षा प्रमाणीकरणासाठी गैरप्रकार सुरु असतानाच फिटनेस सर्टीफिकेटसाठी (तंदुरुस्ती प्रमाणपत्र) आलेल्या रिक्षाच्या चालकांकडून प्रमाणपत्रासाठी अनधिकृतपणे चारशे रुपये आकारण्याचा प्रकार माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय
(३) असल्यास, चौकशीअंती येथील एजंट व संबंधित कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) अशी कोणतीही बाब निदर्शनास आलेली नाही.

ऑटोरिक्षा भाडेमीटर प्रमाणीकरणाचे कामकाज वैधमापनशास्त्र विभागामार्फत केले जाते. तसेच योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणासाठी येणा-या वाहनांचे मीटर प्रमाणीकरणाचे कामकाज केल्यानंतर योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण करुन देण्यात येते. त्यासाठी शासकीय शुल्क रु.३००/- इतके आकारले जाते.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्य मार्ग परिवहन महामंडळाची बस सवलतीची सुमारे २८००
कोटीची रक्कम शासनाकडे थकित असल्याबाबत**

**(८१) * २९८११ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.बसवराज पाटील (औसा), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातर्फे विद्यार्थी, अपंग, जेष्ठ नागरिक अशा समाजातील विविध २४ प्रकारच्या घटकांना सवलतीत प्रवासाची सुविधा दिली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाकडून सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात १२१८ कोटी तर सन २०१५-१६ या वर्षातील १६६.३५० कोटी रुपये एसटीला येणे बाकी असून ही थकबाकी २८० कोटी रुपयांवर पोहचल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने थकबाकीची रक्कम तातडीने महामंडळास सुपूर्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२), (३) व (४) शासनाने दि.१०.२.२०१४ च्या शासन निर्णयान्वये दि.०१.०४.२०१४ पासुन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास सवलत मुल्याची प्रतिपुर्ती सवलती देणाऱ्या संबधित प्रशासकीय विभागांनी आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस आगाऊ स्वरुपात करावी, असा धोरणात्क निर्णय घेण्यात आलेला आहे. तथापि, संबधित प्रशासकीय विभागांनी सन २०१४-१५ व २०१५-१६ ची सवलत

मुल्यांची प्रतिपुर्ती आगाऊ स्वरुपात केली नसल्याने सवलत मुल्यांची रु. २८०० कोटी पर्यंत थकबाकी आहे. सदर सवलत मूल्य प्राप्त करुन घेण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर कार्यवाहीखाली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पारसिक डोंगर (जि.ठाणे) परिसरातील अनधिकृत बांधकामे तसेच दगडखाणींच्या अनिर्बंध उत्खननाबाबत**

**(८२) * ३०९३० श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारसिक डोंगर (जि.ठाणे) परिसरातील अनधिकृत बांधकामे तसेच दगडखाणींच्या अनिर्बंध उत्खननाबाबत १५ दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश कोकण विभागीय आयुक्त यांनी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील आढावा बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना दिल्याची माहिती, जिल्हाधिकारी यांनी पत्रकार परिषदेत दिनांक १२ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पारसिक डोंगर परिसरातील मुंब्रा, कौसा, शिळ, डायघर, अडवली, उतवली, कुकशेत, बोरिवली, पावणे, महापे, तुर्भे , शिरवणे, गोटेघर इत्यादी १६ गावातील वन तसेच शासकीय जमिनीवर झालेल्या अतिक्रमणांची माहिती घेऊन तो अहवालही सादर करण्याचे आदेश दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय, असल्यास, या सर्व परिसरात शासकीय जमिनींवर किती बेकायदेशीर बांधकामे केली आहेत, ती करणाऱ्या व्यक्ती वा विकासक यांची यादी शासनास सादर केली आहे काय,

(४) असल्यास, संबंधित बेकायदेशीर बांधकाम करणाऱ्या व दगड खाणीचे उत्खनन करणाऱ्या व्यक्ती व विकासकाविरुध्द शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) शासकीय व वन जमिनीवरील अनधिकृत बांधकामांचे सर्वेक्षण करण्याचे काम सुरु असून सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाल्यावर अतिक्रमण धारकांची यादी शासनास सादर करण्यात येणार आहे. त्याआधारे वनविभागांच्या मालकीच्या जागेवरील अनधिकृत बांधकामांबाबत वनविभागाकडून तसेच शासकीय जमिनीवरील अनधिकृत बांधकामांबाबत महसूली यंत्रणा व महानगरपालिका यांचेमार्फत संयुक्तपणे कारवाई करण्याचे संकल्पित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोनगांव (जि.हिंगोली) तालुक्यातील घरगुती मीटरमध्ये अफरातफर करुन ग्राहकांची फसवणूक केल्याबाबत

**(८३) * ३०२२४ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनगांव (जि.हिंगोली) या तालुक्यात विद्‌युत वितरण कंपनीकडून घरगुती मीटरमध्ये अफरातफर करुन ग्राहकांची मोठया प्रमाणात फसवणूक करण्यात येत असल्याचा प्रकार माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने घरगुती मीटरमध्ये अफरातफर त्वरीत थांबविण्याबाबत व मीटरमध्ये अफरातफर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) महावितरण कंपनीकडून वीज चोरांवर कारवाई करण्यासाठी धडक मोहिम राबविण्यात येते. त्यामध्ये सेनगांव उपविभागात एप्रिल-२०१५ ते ऑक्टोबर २०१५ या कालावधीत अंदाजे ८५० ग्राहकांच्या मिटरची तपासणी केली असता १३४ ग्राहक वीज चोरी करीत असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार मीटरमधील अफरातफर थांबविण्याबाबत तपासणी अंती दोषी आढळणाऱ्या ग्राहकांवर विजचोरीचे गुन्हे दाखल करण्यात आले असून याबाबत अधिक तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------

**श्रीरामपुर (जि.अहमदनगर) तालुक्यात महावितरणकंपनीमार्फत महिन्याचे घरगुती वापराचे बील ३४ हजार रुपये आल्याबाबत**

**(८४) * ३४४६९ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीरामपुर तालुक्यात (जि.अहमदनगर) येथे महावितरणामार्फत महिन्याचे घरगुती वापराचे बील ३४ हजार रुपये आल्याचे तर फॉल्टी मीटरचे बील मोठ्या प्रमाणात येत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर प्रकरणी महावितरणाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच वीज बील मीटर प्रमाणे योग्य दराने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) महावितरण कंपनीमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(३) श्रीरामपूर तालुक्यातील श्री. राजू नाथा नाईक, मु.पो. उंदीरगांव ग्राहक क्र. ८५०९४०००४२७० यांचे ऑगस्ट २०१५ चे नादुरुस्त मीटर वाचनाखाली रु. ३४,०२८/- चे वीज देयक देण्यात आले होते. चुकीच्या वीज बिलाची दुरुस्ती करुन सुधारीत बिल महावितरण कंपनीकडून ग्राहकास देण्यात आले आहे. तसेच मीटर वाचन करणाऱ्या ठेकेदारांवर रु. २०००/- एवढा दंड कंपनीकडून ठोठावण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जे.एस.डब्लू इस्पात कंपनीला ५७२ कोटींची नियमबाह्य विद्युत शुल्क माफी दिल्याबाबत**

**(८५) * ३२२३० श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जे.एस.डब्लू इस्पात या कंपनीला संबंधित विभागाच्या मंत्र्यांना अंधारात ठेवून ५७२ कोटींची नियमबाह्य विज शुल्क या विभागाच्या सचिवांनी आपल्या अधिकारात माफ केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी उद्योग विभाग व अर्थ विभाग यांनी विज बील माफ करण्यास यापूर्वीच परवानगी नाकारली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाचे आर्थिक नुकसान करणाऱ्या इस्पात कंपनीच्या बाजूने पुरक अहवाल व विज बिलात सुट देण्यासंबंधी सचिव व उप सचिव या अधिकाऱ्यांची गुन्हे अन्वेषण विभागामार्फत चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही. जे.एस. डब्लू इस्पात या कंपनीला उद्योग विभागाच्या सामूहिक प्रोत्साहन योजना, १९९३ च्या आधारे ऊर्जा विभागाच्या दि.२९.१२.१९९९ च्या अधिसूचनेन्वये, पात्रता प्रमाणपत्रात नमूद केलेल्या कालावधीकरीता विद्युत शुल्क माफी देण्यात आली होती. तद्नंतर उद्योग संचालनालयाच्या दि.६.१०.२०१२ च्या आदेशानुसार योजनेच्या सवलतीचा कालावधी आणखी ७ वर्षांनी वाढविण्यात आला. त्या आदेशाच्या आधारे विद्युत शुल्क माफीचा कालावधी वाढविण्याची कंपनीची मागणी होती. सदर कंपनीच्या मागणीच्या अनुषंगाने ऊर्जा विभागाने सवलतीचा कालावधी दि.५.८.२०१९ पर्यंत वाढविण्याकरिता नस्ती विधी व न्याय विभाग तसेच वित्त विभागाकडे सहमतीसाठी पाठविली होती. त्यावर वित्त विभागाने काही मुद्दे उपस्थित केले होते. ती नस्ती परत वित्त विभागाकडे पाठविण्याऐवजी अनवधानाने त्यास सचिव स्तरावर मंजुरी होऊन आदेश निर्गमित झाले. ही बाब लक्षात आल्यानंतर वरील आदेशाची अंमलबजावणी होण्यापूर्वीच त्यास स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे या प्रकरणी शासनाचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही. तसेच सदर कंपनीच्या सवलतीच्या कालावधीची संभाव्य विद्युत शुल्काची रक्कम रु. ५७२ कोटी नसून ती सुमारे रू. २६ कोटी होते.

(२) हे खरे नाही. वित्त विभागाने काही मुद्दे उपस्थित केले होते. त्या मुद्द्यांवरील अभिप्रायासह वित्त विभागाकडे प्रकरण पुन्हा पाठविण्यात आले आहे.

(३) व (४) विद्युत शुल्क माफीच्या अशा प्रकरणाची भविष्यात पुनरावृत्ती होवू नये. यासाठी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत चौकशीची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या आगाराच्या क्षेत्रातील व्यवसायिक गाळे धारक अतिरिक्त जागा अनधिकृतपणे वापरत असल्याबाबत**

**(८६) * २८४१८ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एस.टी.च्या विविध आगारातील परवानाधारक व्यावसायिक हे महामंडळाचे कर्मचारी व अधिकाऱ्यांना हाताशी धरून अतिरिक्त जागेचा वापर करत असून या द्वारे एसटी महामंडळाचे आर्थिक नुकसान होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) नांदेड शहरतील मध्यवर्ती बसस्थानकाच्या द्वाराजवळच खाद्य पदार्थाची दुकाने, हातगाड्या तसेच हॉकर्स उभे असल्यामुळे वृध्द व महिला यांना येथे ये-जा करतांना त्रास होत असून बसस्थानकात अनेक भाडेकरुनी त्यांना दिलेल्या जागेपेक्षा अधिक जागेचा वापर सुरु ठेवला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सुरक्षा व दक्षता विभागाने महामंडळाच्या राज्य भरातील आगारांच्या आवारातील एकूण २ हजार ७६७ परवानाधारक व्यावसायिकांची तपासणी केली असता यामध्ये १ हजार ९४८ व्यावसायिक हे ठरलेल्या करारानुसार महामंडळाची जागा वापरत आहेत तर ७७० व्यावसायिक संबंधित कर्मचारी व अधिकारी यांच्याशी संगनमत असल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीअंती याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या महामंडळाचे कर्मचारी व अधिकारी व व्यावसायिक यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) होय.
(३), (४) व (५) सुरक्षा व दक्षता विभागाने केलेल्या तपासणीत एकूण २७६७ वाणिज्य आस्थापनांपैकी तपासणी केली असता १९४८ आस्थापनाधारक करारानुसार ठरवुन दिलेली जागा वापरत असल्याचे व ७७० आस्थापनाधारक हे करारानुसार ठरवुन दिलेल्या जागेपेक्षा अतिरिक्त जागा अनधिकृतपणे वापरत असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार राज्य परिवहन महामंडळाने दिनांक २८.७.२०१५ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने विभागीय पातळीवर स्थापन करण्यात आलेल्या संयुक्त समितीमार्फत प्रत्यक्ष तपासणी करुन नैसर्गिक न्याय तत्वाच्या आधारावर अतिरिक्त जागा वापरापोटीची रक्कम संबंधितांकडून वसूल करण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर कार्यवाहीखाली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील नर्मदा बचाव आंदोलनकर्त्यांना पर्याप्त न्याय व मोबदला प्रदान करण्याबाबत

**(८७) * ३०८५३ श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील नर्मदा बचाव आंदोलनकर्त्यांना पर्याप्त न्याय व मोबदला प्रदान करण्याबाबतची मागणी राज्यातील प्रकल्पग्रस्त बाधीत शेतकरी व त्यांच्या कुटूंबियांनी मा.मुखमंत्री मा. मंत्री (महसूल पुनर्वसन) राज्यमंत्री (महसूल पुनर्वसन) प्रधान सचिव (महसूल पुनर्वसन), संबंधित महसूल विभागाचे आयुक्त संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी संबंधित जिल्हयाचे उपविभागीय महसूल अधिकारी (प्रांत) यांनी माहे १६ जुलै, २०१५ वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्‌वारे कार्यवाहीची मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशीअंती कोणती ठोस उपाययोजना तातडीने कार्यान्वित केली वा करण्याचे प्रस्तावित केले आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) होय,
मा. मुख्यमंत्री यांना श्री. अबू आजमी, विधानसभा सदस्य यांच्या दिनांक १६.७.२०१५ रोजीच्या निवेदनाची दिलेली प्रत प्राप्त झाली आहे, सरदार सरोवर धरणाची विद्‌यमान उंची १२१.९२ मीटर असून, सदर उंचीवर पुलांचे खांब, त्यावर पुल

आणि त्यामधील दरवाजे याचे बांधकाम करुन ते खुल्या स्थितीत ठेवणे, या सुमारे १७ मीटर उंचीच्या पहिल्या टप्प्याचे बांधकामास केंद्र शासनाने दिनांक १२ जून, २०१४ रोजी, नर्मादा जलविवाद लवादाचा निर्णय, नर्मदा बचाव आंदोलनकर्त्यांनी मा. सर्वोच्च न्यायालयासमोर दाखल केलेल्या याचिकेमध्ये दिनांक २०.१०.२००० रोजी दिलेले निर्देश याचे अनुपालन करुन मान्यता दिलेली आहे. सदर बांधकामामुळे धरणाची उंची १३८.६२ मीटर इतकी होणार आहे. या निर्णयास नर्मदा बचाव आंदोलन यांनी मा. सर्वोच्च न्यायालयासमोर याचिका क्र. ३२८/२००२ मधील अंतर्गत अर्ज क्र. ४०-४५/२०१४ अन्वये आव्हान करुन केंद्र शासनाच्या निर्णयास स्थगिती देण्याची विनंती केलेली आहे. यांच्या आजमितीपर्यंत एकूण १४ सुनावण्या झाल्या असून, पुढील सुनावणी दि. २२.१.२०१६ रोजी आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाद्वारे प्रकल्पगस्तांच्या पुनर्वसनाबाबत संबंधित सर्व राज्यांनी केलेल्या कार्यवाहीचे काटेकोर परीक्षण करण्यात येत आहे. नर्मदा जलविवाद लवादाच्या निर्णयातील तरतुदी राज्य शासनाचे धोरण आणि मा. सर्वोच्च न्यायालयाचे निदेश यानुसारच प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**आळते (ता.हातकंणगले, जि.कोल्हापूर) येथे अवैध मुरुम उत्खनन सुरु असल्याबाबत**

**(८८) * ३४१७९ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामलिंग डोंगराच्या पायथ्याशी (ता.हातकंणगले, जि.कोल्हापूर) आळते गावाच्या हद्दीतील गट क्र. ११३६ मध्ये माहे ऑक्टोबर, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात मोठ्या प्रमाणात मुरुमाचे उत्खन्न सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाममात्र रॉयल्टी भरून हजारो ब्रास मुरुमाची राजरोजपणे लूट करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधित दोषी असणाऱ्या शासकीय अधिकारी व ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) मौजे आळते, ता. हातकणंगले येथील गट नं. ११३६ मध्ये तहसिलदार हातकणंगले यांनी दिनांक ०५/०९/२०१५ ते दि. १७/१०/२०१५ या कालावधीकरीता एकूण ६०० ब्रास मुरूम उत्खननाकरीता तात्पुरती परवानगी दिली होती. त्याअनुषंगाने परवानाधारकाने स्वामित्वधनाची रक्कम जमा करुन मुरूम उत्खनन केले. दि १९/१०/२०१५ रोजी सदर उत्खननाची मोजमापे घेतली असता परवानाधारकाने १३५ ब्रास मुरूम जास्त उत्खनन केल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत तहसिलदार हातकणंगले यांनी संबंधितास अवैध उत्खननाबाबत नोटीस दिली असून, पुढील कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**चंद्रपूर जिल्ह्यातील १५ तालुक्यातील शेतकऱ्यांना वितरित करण्यात आलेल्या बंड्या अतिशय निकृष्ट दर्जाच्या असल्याबाबत**

**(८९) * ३५०५० श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील १५ तालुक्यातील शेतकऱ्यांना वितरित करण्यात आलेल्या बंड्या अतिशय निकृष्ट दर्जाच्या असल्याने, शेतकऱ्यांनी २० रुपये किलो भंगारात विकत असल्याची बाब दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती शासनाने संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) जिल्ह्यातील राजुरा, ब्रम्हपूरी, सावली, मुल, शिंदेवाही व जिवती या तालुक्यामध्ये केलेल्या प्राथमिक चौकशीत नमुना बैलगाड्यांचे वजन २४० किलो ऐवजी १९५ किलो ते २६० किलो पर्यंत असल्याचे आढळून आले.

तथापि, शेतकऱ्यांना वितरित करण्यात आलेल्या बंड्या भंगारात विकल्याचे आढळून आले नाही.
(२) व (३) गुणवत्तापूर्ण औजारे पुरविण्याची जबाबदारी पूर्णत: संबंधित पुरवठा संस्थेची असल्याने, प्रस्तूत प्रकरणी, महाराष्ट्र कृषी विकास महामंडळ मर्यादित, चंद्रपूर या शासननियुक्त पुरवठादार संस्थेकडून खुलासा मागविला असून, मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कारवाई करण्याबाबत कळविले आहे.

त्याचप्रमाणे पुरवठादार संस्थेची, पुरवठा पश्चात तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर अदा करावयाची देयके थांबविण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विदर्भ व मराठवाडा येथील शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणा आणि नापिकीला कंटाळून केलेल्या आत्महत्या**

**(९०) * २९८७७ श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.प्रतापराव चिखलीकर (लोहा), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ व मराठवाडा येथील शेतकऱ्यांनी पेरलेले सोयबीन पीक हातचे गेल्याने अनेक शेतकऱ्यांनी गळफास लावून दिनांक १३ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास आत्महत्या केली व कोलखेड (ता.अकोला) येथील शेतकरी मंगेश गणेश उमाळे या शेतकऱ्यांने कर्जबाजारीपणा आणि नापिकीला कंटाळून आत्महत्या केली असल्याचे माहे ऑगस्ट व ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाडयातील ८ जिल्ह्यांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची संख्या ५७४ असूनही केवळ तरी ३६० शेतकरी कुटूंबच आर्थिक मदतीसाठी पात्र दाखविण्यात आले असून ११६ जणांना अपात्र व ९८ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(३) असल्यास, शेतीचा दर्जा वाढविण्याबाबत, शेतकरी वर्गात जनजागृती वाढ करुन आत्महत्या रोखण्याबाबत तसेच आर्थिक मदतीसाठी प्रलंबित असलेली प्रकरणे तातडीने निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय

(२) औरंगाबाद विभागात जानेवारी ते ऑगस्ट २०१५ या कालावधीत एकुण ६४१ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहेत त्यापैकी ४६९ प्रकरणे पात्र असून १८ प्रकरणांची चौकशी सुरु आहे. सर्व पात्र प्रकरणात मदत वाटप करण्यात आली आहे,

(३) शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी विशेष कार्यक्रम राबविण्याबाबत दिनांक च्या २४.७.२०१५ शासन निर्णयान्वये धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार शासनाच्या विविध विभागांना उपाययोजना करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी विविध उपाययोजना करण्यासाठी पथदर्शी प्रकल्प म्हणून विशेष मदतीचा कार्यक्रम राबविण्यासाठी यवतमाळ व उस्मानाबाद या दोन जिल्हयांची निवड करण्यात आली आहे.

उपरोक्त पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी उस्मानाबाद व यवतमाळ जिल्हयातील जिल्हास्तरिय व ग्रामस्तरिय समित्यांना रु.४८८५.०० लाख इतका untied निधी मंजूर केला असून त्यापैकी रु.३४१९.०० लाख इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जगबुडी नदीपात्रात (ता.खेड, जि.रत्नागिरी) वाळू उत्खननास दिलेल्या परवानगीची मुदत संपली असतानाही वाळू उपसा होत असल्याबाबत**

**(९१) * ३७०५०  श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जगबुडी नदीपात्रात (ता.खेड, जि.रत्नागिरी) वाळू उत्खननास दिलेल्या परवानगीची मुदत दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास संपली असतानाही वाळू माफियांकडून वाळू उत्खनन सुरु असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वाळू माफियांवर कारवाई करण्याची मागणी तेथील नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बेकायदा वाळू उत्खनना सदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) जगबुडी नदीपात्रात (ता.खेड जि.रत्नागिरी) वाळू उत्खननास परवानगी देण्यात आलेली नसून, माहे ऑक्टोबर २०१५ च्या सुमारास अनधिकृतपणे वाळू उत्खनन व वाहतूक सुरु असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) अशा प्रकारची कोणतीही लेखी अथवा तोंडी तक्रार प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(३) व (४) खेड तालुक्यात माहे एप्रिल, २०१५ ते माहे ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत वाळूच्या अवैध वाहतुकीची १९ प्रकरणे निदर्शनास आली असून, सदर प्रकरणात रु. ४,८६,१००/- एवढी दंडाची रक्कम आकारण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मालाड (मुंबई) पश्चिमेकडील लिंकिंग रोड येथील आदिवासी जमिनीच्या व्यवहाराची परवानगी नसताना अभिलेखात नोंद घेतल्याबाबत**

**(९२) * २९९६७ श्री.विजय औटी (पारनेर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड (मुंबई) पश्चिमेकडील लिंकिंग रोड परिसरातील "भूमी क्लासिक" या खाजगी विकासकाच्या गृह प्रकल्पाचा मुळ भूखंड हा आदिवासींच्या नावावर असताना महसूल विभागाच्या उपनगर जिल्हाधिकाऱ्यांनी विकासकाच्या नावार करुन देऊन केलेल्या घोटाळयाचे प्रकरण नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबादारी निश्चित करण्याचे आदेश मा.महसूल मंत्री यांनी दिनांक ८ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमरास दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषीं अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) दिनांक २९.२.१९९६ रोजी श्री. गणपत पांगल्या तबाली व मे. एव्होरा बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स प्रा. लि. यांच्यामधील झालेला करार महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ३६ अ च्या पोटकलम (१) मधील तरतुदींविरोधात असल्यामुळे त्याअंतर्गत मौ. मालाड, ता. बोरीवली, स.नं. ५०४ अ (पै), न.भू.क्र. १४०६-जी/१ पै, क्षेत्र ८६१६ चौ.मी. ही मिळकत महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ३६ अ च्या पोटकलम (५) मधील तरतुदीनुसार शासनजमा करण्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी दिनांक १३.४.२०१५ रोजी आदेश पारीत केले आहेत. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी सदर भूखंड विकासकाच्या नावावर केला, अशी वस्तुस्थिती नाही.

(२) व (३)

प्रश्नाधीन प्रकरणी शासनाची परवानगी नसताना आदिवासी जमिनीच्या व्यवहाराची नोंद अधिकार अभिलेख्यात घेण्यात आली होती काय? असल्यास तशी नोंद अधिकार अभिलेख्यामध्ये घेण्यास कोण जबाबदार आहे त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा, अशा सूचना शासन पत्र, महसूल व वन विभाग, दिनांक ९.७.२०१५ अन्वये जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना देण्यात आल्या होत्या.

(४) त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक १.१२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर केला आहे. या अहवालाच्या अनुषंगाने अधिक माहिती जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडून मागविण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अमरावती विभागात अवकाळी पावसामुळे झालेल्या शेती व फळ पिकांच्या नुकसानीकरीता शासनाने दिलेल्या निधीचे वाटप अद्याप झाले नसल्याबाबत**

**(९३) * ३२०९२ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व), श्री.बसवराज पाटील (औसा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागात माहे फेब्रुवारी व मार्च, २०१५ मध्ये अवकाळी पावसामुळे झालेल्या शेती व फळ पिकांच्या नुकसानीकरीता शासनाने ५१ कोटी १९ लाख १४ हजार उपलब्ध करुन दिलेल्या निधीपैकी १० कोटी २२ लाख ५० हजार निधीचे वाटप अद्यापी झाले नसल्याची बाब दिनांक ७ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गतवर्षी दुष्काळ जन्य स्थितीमुळे शासनाने शेतकऱ्यांना दिलेल्या अर्थसहाय्य मधील १९ कोटी ५३ लाख रु. चे वाटप ही अद्याप बाकी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अमरावती विभागातील एकूण ११ हजार शेतकऱ्यांना रखडलेले अर्थसहाय्य वाटप करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर निधीचे वाटप संबंधित शेतक-यांना वेळेत न करणा-या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आाहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे. खरीप २०१४ (अवर्षण ) मध्ये बाधित झालेल्या शेतकऱ्यांना प्राप्त झालेल्या निधीच्या वाटपाची कार्यवाही सुर आहे.

(३) खरीप हंगाम २०१४ मधील वाटपासाठी शिल्लक असलेला निधी शेतकऱ्यांचे बँक खाते क्रमांक प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधित तहसिलदार यांचे स्तरावरुन ग्राम पंचायत नोटीस बोर्डवर शिल्लक खातेदारांची नावे प्रसिध्द करण्यात आली. तसेच बाहेरगावी राहणाऱ्या खातेदारांना नोटीसद्वारे सुध्दा कळविण्यात आले आहे. अनुदान वाटपाबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील हडपसर परिसरात बांधकाम व्यावसायिकांकडून शासकीय गायरान जमिनीवर झालेले अतिक्रमण

**(९४) * ३०९२९ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील हडपसर परिसरात दिवसेंदिवस मोठया प्रमाणात नागरिकीकरण होत असून त्यासाठी अनेक बांधकाम व्यावसायिकांकडून पाटबंधारे विभागाच्या तसेच शासकीय गायरान जमिनीवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मांजरी बुद्रुक साडेसतरानळी व फुरसुंगी हद्दीतील शासकीय गायरान जमिनीवर मोठया प्रमाणात बेकायदेशीररित्या बांधकामे सुरु आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने जमिनीवर केलेले अतिक्रमण व बांधकाम पाडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

जलसंपदा विभागाकडील जमिनीवर काही ठिकाणी बांधकाम व्यावसायिकांकडून अतिक्रमण झालेले आहे.

(२) मांजरी ब्रुदुक, साडेसतरानळी व फुरसुंगी येथील सरकारी गायरान जमिनीवर बांधकाम व्यावसायिकांचे अतिक्रमण झाल्याचे दिसून येत नाही. तथापि, सदर सरकारी गायरान जमिनींवर पूर्वी पासूनची काही अतिक्रमणे असल्याचे अतिक्रमण नोंदवहीवरुन दिसून येते.

(३) व (४) जलसंपदा विभागाशी संबधीत जमीनीवर बांधकाम व्यावसायिकांकडून झालेल्या अतिक्रमणाबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(५)प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**नांदेड जिल्ह्यातील देगलूर, बिलोली व मुखेड या तालुक्यात रब्बी हंगामामध्ये अवकाळी पाऊस व गारपीटमुळे शेती पिक, फळांचे व घरांचे झालेले नुकसान**

**(९५) * ३४४४३ श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील देगलूर, बिलोली व मुखेड या तालुक्यात सन २०१४ मध्ये रब्बी हंगामामध्ये गारपीठीने शेती पिक, फळांचे व घराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले त्यांचेकरिता शासनाने नुकसान भरपाई जाहिर केली परंतु अद्यापर्यंत नुकसान भरपाई मिळालेली नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई न मिळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) नांदेड जिल्ह्यातील देगलूर, बिलोली व मुखेड या तालुक्यात दि. २३.०२.२०१४ ते दि. १४.०३.२०१४ या दरम्यान झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे शेतीपिकांच्या झालेल्या नुकसानीसाठी आपदग्रस्त शेतक-यांना तसेच घरांच्या पडझडीसाठी आपदग्रस्तांना मदतीचे वाटप करण्यात आले आहे.

(४)) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भटाळी, पायली, तिरंवजा, चांदसुर्ला आणि कवटी (जि.चंद्रपूर) यागावातील शेतकऱ्यांच्या शेतजमिनी वेस्टर्न कोलफिल्डसने अधिग्रहीत केल्याबाबत**

**(९६) * ३२४७९ श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहरापासून १० कि.मी. अंतरावर असलेले भटाळी, पायली, तिरंवजा, चांदसुर्ला आणि कवटी यागावातील शेतकऱ्यांची सुमारे ११०० हेक्टर शेतजमिन सन २०११ मध्ये वेस्टर्न कोलफिल्डसने अधिग्रहीत केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या चौथ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावातील जमिनी अधिग्रहण करतांना शेतकऱ्यांना ओलिताच्या शेतीसाठी रु. १० लक्ष कोरडवाहूसाठी रु ८ लक्ष, आणि पडीक जमिनीसाठी रु ६ लक्ष रुपयांचा दर निश्चित करण्यात आला याशिवाय प्रत्येक कुटुंबातील एकाला नोकरी देण्याचे ठरले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाच वर्षापेक्षा जास्त कालावधी लोटून सुध्दा शेतकऱ्यांना अद्यापही मोबदला देण्यात आला नाही किंवा नौकरी देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त गावातील शेतकऱ्यांच्या शेतजमिनी अधिग्रहीत असल्यामुळे शेतकऱ्यांना खरेदी-विक्री व्यवहार करण्यास बंदी आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त गावातील पिडीत शेतकऱ्यांना अधिग्रहीत जमिनीचा मोबदला देण्यासंदर्भात अथवा सदर जमिनी मुळ मालकांना परत करण्याकरिता कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.

चंद्रपूर जिल्हयातील भटाळी, पायली, तिरवंजा, चांदसुर्ला येथील ४२७.०३ हेक्टर खाजगी जमिन कोल बेअरिंग एरिया अॅक्ट, १९५७, नुसार वे.को.फि.लि.द्वारा अधिग्रहित करण्यात आली.या कायद्यामधील कलम ९ (१) अन्वये अधिसुचना दि.१३.९.२०११ रोजी कंपनीद्वारे जाहिर करण्यात आली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

अद्याप जमिनीचा ताबा घेतलेला नाही. कंपनीला दि.३१.३.१५ रोजी भारत सरकारकडून रू.९०,४२,९२,९७८ एवढा निधी मंजूर झालेला आहे. ४०९ प्रकल्प ग्रस्तांना नोकरी देण्यासंबंधी कंपनीकडून दि.२३.७.१५ रोजी प्रस्ताव मुख्यालयी सादर केलेला आहे. कोल इंडिया आर.आर.पॉलिसी २०१२ नुसार प्रकल्प ग्रस्तांना नोकरी ऐवजी पुनर्वसन अनुदान देण्यात येईल.

(४) हे खरे आहे,

कारण उपरोक्त उप प्रश्न १ मध्ये नमुद केल्याप्रमाणे कलम ९(१) अन्वये अधिसुचना जाहिर करण्यात आलेली आहे.

(५) प्रकरणात कार्यवाही सुरु असल्याने चौकशीचा प्रश्न येत नाही .

(६) व (७) अद्याप जमिनीचा ताबा कंपनीद्वारे घेण्यात आलेला नाही. मोबदला वाटपाची कार्यवाही वे.को.फी.ली.द्वारा लवकरच सुरु करण्यात येत आहे.

-----------------

**राज्यातील विजेच्या धक्क्यांमुळे होणाऱ्या दुर्घटना कमी करण्याबाबत**

**(९७) * २८८२८ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विजेच्या धोक्क्याने वर्ष भरात १५०० जणांना जीव गमवावा लागल्याची धक्कादायक आकडेवारी माहे ऑगस्ट, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच, असुरक्षित वीजपुरवठा होत असल्यामुळे नांदेड जिल्ह्यातील नांदेड परिमंडळात मागील वर्षभरात ५० हून अधिक जणांना जीव गमवावा लागला असल्याचे ही माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इन्फ्रा आरएपीडीआरपी योजनांमध्ये वीज यंत्रणा सुधारण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च केले जाते यामध्ये वीज उपकरणे हाताळण्यातील चुका, वीज वितरण यंत्रणा कोलमडणे, वीजवाहिणी तुटने आदिंसारख्या दुर्घटनेत मोठ्या प्रमाणात जिवीतहाणी झाल्याचे समजते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, आतापर्यत यंत्रणेतील अनेक दोष सुधारण्यासाठी कोणतेही अद्ययावत तंत्रज्ञान नसल्यामुळे यंत्रणेत सुधारणा होत नसल्याचे कळते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, विजेच्या धक्क्यापासून होणाऱ्या दुर्घटनेमुळे महावितरणच्या यंत्रणेतील कर्मचारी, सामान्य नागरिक आणि प्राणी अशा दुर्घटनात दगावले असून यावर उपाययोजना करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशत: खरे आहे. प्राप्त अहवालानुसार एप्रिल २०१४, ते मार्च २०१५ या वर्षभरात एकूण प्राणांतिक अपघातांची संख्या ७९९ आहे. त्यात कर्मचाऱ्यांची संख्या ४० व बाहेरील व्यक्तींची संख्या ७५९ इतकी आहे.

(२) हे खरे नाही.प्राप्त अहवालानुसार नांदेड परिमंडळात एप्रिल २०१४ ते मार्च २०१५ या वर्षभरात एकूण प्राणांतिक अपघातांची संख्या ३८ आहे. यात कर्मचाऱ्यांची संख्या ०४ व बाहेरील व्यक्तींची संख्या ३४ इतकी आहे.

(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) महावितरण कंपनीकडून विद्युत सुरक्षेविषयी ग्राहक व जनतेत जागरुकता निर्माण करण्यासाठी विविध स्तरावर रॅलीचे आयोजन करण्यात येते. प्रशिक्षण व सुरक्षा विभाग नाशिक अंतर्गत कार्यरत प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र नाशिक, अमरावती,औरंगाबाद व सांगलीद्वारे ग्राहकांना सुरक्षाविषयी मार्गदर्शन करणारे एकूण १०० कार्यक्रम आयोजित करण्याचा कृती आराखडा तयार करण्यात आलेला आहे. व त्या अनुषंगाने ऑक्टोबर २०१५ पर्यत एकूण ३५ कार्यक्रम राबविण्यात आलेले आहेत. कर्मचाऱ्यांना होणारे विद्युत अपघात कमी करण्यासाठी महावितरणच्या मंडल कार्यालयाच्या अंतर्गत २५ लघु प्रशिक्षण केंद्रात विद्युत सुरक्षेविषयी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येते. कर्मचाऱ्यांना सुरक्षा साधने पुरविली जातात.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात मोटार अपघात जखमी आणि मृत झालेल्या व्यक्तींचे नुकसानभरपाईचे दावे मोठया प्रमाणात प्रलंबित असल्याबाबत

**(९८) * २९५०८ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अपघातात जखमी आणि मृत झालेल्या व्यक्तींना तातडीने नुकसानभरपाई मिळावी म्हणून मोटर ॲक्सिडेंट क्लेम्स ट्रीब्युनल अंतर्गत (एमव्ही ॲक्ट) विशेष लवाद नेमण्यात आला परंतु वाढत्या लोकसंख्येबरोबरच वाढत्या वाहनांच्या समस्यांमुळे वाहन अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढले असून गेल्या वर्षभरात ९१ हजार १९ अपघाताचे दावे मोटर लवादाकडे प्रलंबित असून त्यापैकी केवळ ५ हजार ९९५ दावे निकाली काढले गेले तर ४ हजार ८१५ दावे नव्याने दाखल झाल्याने वर्षाअखेर प्रलंबित दाव्याची संख्याही ८९ हजार ८३९ पर्यंत पोहचली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास ,मोठ्या प्रमाणात प्रलंबित असलेले दावे लवकरात लवकर निकालात काढण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारण कारणे काय आहेत,

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही, मोटार अपघात दावा न्यायधिकरणाकडे १ जानेवारी, २०१५ अखेर ८७०५१ दावे प्रलंबीत होते, त्यामध्ये ३० ऑक्टोबर, २०१५ अखरे २०४४१ दाव्यांचा समावेश झाला असून १ जानेवारी, २०१५ ते ३० ऑक्टोबर, २०१५ याकालावधीत २०९९३ दावे निकाली काढण्यात आले आहेत,

(२) व (३) मोटार अपघात दावा न्यायाधिकरणातील प्रलंबित असलेले दावे निकाली काढण्यासाठी मा.उच्च न्यायालयाच्या सूचनेनुसार “लोक न्यायालय” अयोजित करुन दावे निकाली काढण्यात येतात. तसेच काही दावे “मध्यस्थी केंद्राकडे” आपसी तडजोडीकरिता ठेवण्यात येत आहेत. मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या सूचनेनुसार ५ वर्षावरील प्रकरणे प्राधान्याने सुनावणीस घेऊन निकाली काढण्यात येतात.

-----------------

**विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यात गतिमान पाणलोट विकास योजना व राष्ट्रीय पाणलोट विकास योजनेच्या निधी वाटपात झालेला गैरव्यवहार**

**(९९) * ३५५२१ श्री.विलास तरे (बोईसर), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)पालघर जिल्ह्यातील विक्रमगड तालुक्यासाठी २०१४-१५ मध्ये गतिमान पाणलोट विकास योजना, राष्ट्रीय पाणलोट विकास योजना व अन्य योजनेकरिता कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध होऊनही कृषी अधिकाऱ्यांनी त्या निधीचे वाटप न करता सदरहू निधी आपआपसात वाटून घेऊन गैरव्यवहार केल्याची तक्रार स्थानिक शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांकडे दिनांक २२ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे हे खरे आहे काय,

(२)असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय?

(३) असल्यास,चौकशीच्या अनुषंगाने संबंधित कृषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बीबीएफ यंत्र खरेदीत कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(१००) * ३१४६९ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीबीएफ यंत्र खरेदीत कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाला असून सदर प्रकरणाची चौकशी करुन दोषी व्यक्तींविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करावा अशी लेखी मागणी दक्ष नागरिक संघटनेच्या वतीने मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे केल्याचे निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र कृषी व औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून काढण्यात आलेल्या निविदांमधून मे.महाशक्ती, वर्धा, मे.साई, यवतमाळ, मे.प्रभु, जळगांव, मे.रोहित, पुणे अशा चार कंपन्यांना देण्यात आलेली कंत्राटे व त्यामध्ये झालेला आर्थिक गैरव्यवहार याबाबतचा तपासही पूर्ण झाला आहे काय,

(३) असल्यास, तपासाअंती त्यामध्ये दोषी आढळलेल्या व्यक्तींविरुध्द शासनाने कोणती कारवाई वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १७ ऑगस्ट, २०१५ रोजी श्री.संजय वणवे, अध्यक्ष, दक्ष नागरीक संघटना, मुंबई यांचे निवेदन प्राप्त झाले आहे तथापि, सदर निवेदनामध्ये दोषी व्यक्तीवर फौजदारी गुन्हा दाखल करावा अशी लेखी मागणी करण्यात आली हे खरे नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठिंबक सिंचनाचे विदर्भातील शेतकऱ्यांचे १७८ कोटी रुपयांचे अनुदान थकित असल्याबाबत**

**(१०१) * २८४२१ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंचन प्रकल्पांचा अभाव असलेल्या विदर्भात सन २०१२-१३ व सन २०१३-१४ पासून राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून करण्यात आलेल्या विशेष तरतूदीतून

राबविण्यात आलेल्या विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रमाद्वारे अल्पभूधारक शेतकऱ्यांना ७५ टक्के तर उर्वरित शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदान देण्याच्या योजनेचे विदर्भातील शेतकऱ्यांचे तब्बल १७८ कोटी रुपयाचे अनुदान थकले असल्याची बाब माहे सप्टेंबर २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी मा.विरोधी पक्षनेते यांनी मा.कृषि मंत्री यांना सदर बाब माहे ऑक्टोबर, २०१५ च्या वा त्यादरम्यान पत्राद्वारे कळविली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती सदर अनुदान तातडीने अदा करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.

सन २०१२-१३ या वर्षातील वर्धा जिल्हयातील रुपये ७.६९ लक्ष व सन २०१४-१५ या वर्षातील रुपये ४३.१८ कोटी एवढ्या रकमेचे प्रलंबित प्रस्ताव सन २०१५-१६ या वर्षात उपलब्ध करुन दिलेल्या रुपये ५० कोटी निधीमधून निकाली काढण्यास दिनांक २९ ऑक्टोबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

सन २०१३-१४ या वर्षातील रुपये ३५.१३ कोटी व सन २०१४-१५ या वर्षातील रुपये १३७.२८ कोटी असे एकूण १७२.४१ कोटी एवढ्या रकमेच्या ऑनलाईन प्रस्तावांना मान्यता देण्यात आलेली नाही.

(२) पत्र प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(३) अंशत: खरे आहे. चौकशी सुरु आहे.

(४) प्रश्न भाग १ च्या उत्तरात नमूद केल्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील दुग्ध शाळांपासून ७० टक्के परतावा शासनाला न मिळण्याबाबत

**(१०२) * २९९८२ श्री.विजय औटी (पारनेर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एकूण ३८ शासकीय दूध योजना असून या योजनेसाठी शासनाने ४४,६५० कोटी रुपयांची गुंतवणूक केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऐवढी गुंतवणूक करुनही शासकीय दूध योजनेकडून शासनास ७० टक्के परतावा मिळाला नसल्याची धक्कादायक माहिती दिनांक २३ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय दूध योजना तोटयात असल्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने शासकीय दूध योजना सुरळीत होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) दुग्धव्यवसाय विकास विभागाची स्थापना झाल्यापासून आत्तापर्यंत शासनाने वेळोवेळी राज्यात ३८ दुग्धशाळांची स्थापना केली असून त्याकरिता सुमारे रुपये १२८ कोटी एवढी गुंतवणूक केली आहे.

(२) शासकीय दूध योजना ह्या कल्याणकारी योजना म्हणून राबविण्यात आल्या आहेत. त्यामागे परतावा/नफा मिळविणे हा उद्देश नव्हता.

ग्रामीण भागातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना शेतीपुरक जोडधंद्यापासून उत्पादीत दुधास वाजवी दर मिळावा व शहरी भागातील सर्वसामान्य ग्राहकांना किफायतशीर दराने दूध उपलब्ध करुन देण्याचा मूळ उद्देशाने दुग्धशाळांची स्थापना केली आहे. त्यामुळे या दुग्धशाळांपासून ७० टक्के परतावा मिळणे अपेक्षित नाही.

(३) १. दूध खरेदी दरव वरकड खर्च मिळून दूध उत्पादन खर्च विक्री दरापेक्षा जास्त असतो. परंतु ग्राहकांना रास्त दरात दूध उपलब्ध व्हावे यासाठी दूध विक्रीची किंमत वाजवी ठेवावी लागते.

२. दुग्धव्यवसायात सहकार व खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढल्याने शासनाच्या दुग्धशाळा कमी क्षमतेने कार्यरत आहेत. त्यामुळे प्रक्रिया व उत्पादन खर्च जास्त होतो.

३. शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने बाजारातील अतिरिक्त दूध खरेदी करुन त्याचे दूध भुकटी व लोण्यात रुपांतरण करावे लागते यामध्ये शासनास तोटा सहन करावा लागातो.

४. दुग्धशाळांमधील यंत्रसामुग्री ३० ते ३५ वर्ष जुनी असल्याने त्यांची कार्यक्षमता कमी झाल्यामुळे देखभाल व दुरुस्तीवर जास्त खर्च करावा लागतो.

५. कर्मचारी व कामगारांच्या वेतन व भत्यास वेळोवेळी होणाऱ्या वाढीमुळे तोट्याच्या प्रमाणात वाढ होते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) १. दूध योजनांचे सहकारी संघाकडे हस्तांतरण जलद गतीने व्हावे यासाठी हस्तांतरणाच्या दि. ११.११.२००२ च्या शासन निर्णयात सुधारणेबाबत कार्यवाही चालू आहे.

२. शासनाच्या महसूलात वाढ होण्यासाठी आरे ब्रँड इतर उत्पादकांना निविदा काढून वापरण्यासाठी दिला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्य मार्ग परिवहन महामंडळात वाहकांकडून तिकिटांमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(१०३) * २८८४६ अ‍ॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वर्षभरात एस टी महामंडळात वाहकांकडून तिकिटांमध्ये ३०० कोटींचा अपहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय?

(२) असल्यास,सुरक्षा व दक्षता विभागाने २०१४-१५ या कालावधीत वाहकांची ३६२३ अपहारांची प्रकरणे निदर्शनास आणली असल्याचे कळते, हे खरे आहे काय,

(३)असल्यास, कमी मनुष्य बळामुळे ही अपहार प्रकरणे निदर्शनास येण्याची संख्या कमी असल्याचे समजते, हे ही खरे ओह काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती शासनाने दोषाविरुध्द काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही.

(२) सन २०१४-१५ या कालावधीत सुरक्षा व दक्षता खात्यामार्फत वाहकाच्या अपहाराची ३६२३ प्रकरणे व वाहतूक खात्यामार्फत २४६७ अशी एकूण ६१९० प्रकरणे उघडकीस आणली आहेत.

(३) हे खरे आहे.

सन २०१४-१५ मध्ये २७० वाहतूक निरीक्षक व २५८ सहा.वाहतूक निरिक्षक मार्गतपासणीसाठी कमी होते.

(४) व (५) सदर अपहार प्रकरणांची चौकशी करुन दोषी वाहकांवर राज्य परिवहन महामंडळाच्या शिस्त व आवेदन  कार्यपध्दतीनुसार कारवाई करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.